रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १६ ◆ अंक ३५१
www.ramprahar.com

सोमवार, ८ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## आसाममधील पूरस्थिती गंभीर; मृतांचा आकडा ६४वर



**आसाम :** आसाममधील पूरस्थिती गंभीर बनली आहे. अनेक नद्या धोक्याच्या पातळी ओलांडून वाहत आहेत. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, रविवार (दि. ७)पर्यंत पाऊस आणि पुरांशी संबंधित घटनांमधील मृतांचा आकडा ६४ वर पोहचल्याची नोंद झाली आहे. आसाममधील पुराने ३,५३५ गावांमधील सुमारे २३.९ लाख लोक प्रभावित झाले आहेत. तर ५० हजारांहून अधिक लोकांनी राज्यातील निवारागृहात आश्रय घेतला आहे. धुबरी जिल्ह्याला पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे. येथील सुमारे ७.९५ लाख अधिक लोक पुरामुळे प्रभावित झाले आहेत. कचर आणि दरांगमध्ये प्रत्येकी सुमारे १.४० लोक प्रभावित झाले आहेत. ब्रह्मपुत्रा आणि बराक या प्रमुख नद्यांमध्ये जोरहाट ते धुबरीपर्यंत पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे.

**अंतरंग**

कर्जतमध्ये भाजपच्या परिवर्तन हेल्पलाईन ॲपचा शुभारंभ/२

पनवेल महापालिकेतर्फे आपत्कालीन कार्य सुरू/३

कुंडलिका नदी परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा/७

# मुसळधार पावसाने झोडपले!

## रायगडातील सखल भागांमध्ये पाणी; जनजीवन विस्कळीत

**पनवेल : वार्ताहर**

अनेक दिवस दडी मारलेल्या पावसाने शनिवारी रात्रीपासून दमदार हजेरी लावली. रविवारी (दि. ७) पहाटे पावसाचा जोर आणखी वाढला आणि पनवेल परिसरातील गावांना या मुसळधार पावसाचा फटका बसला. सखल भागात पाणी शिरले होते. आदई, कळंबोली, पडघे या परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. दरम्यान, रायगड जिल्ह्यात शनिवार, रविवार झालेल्या मुसळधार पावसाचा रोहा, पोलादपूर, महाड येथील गावांना फटका बसला.

पनवेल आणि परिसरात शनिवारपासून पावसाने आपली संततधार सुरू ठेवली होती. शनिवार आणि रविवार विकेंड असल्याने अनेकांनी पावसाचा आनंद घेतला. दरम्यान, पनवेल शहरातील तालुका पोलीस ठाणे परिसर, मिडल क्लास सोसायटी, टपाल नाका, ठाणा नाका, लाईन आळी येथे पाणी साचले होते. कळंबोली वसाहत, कामोठे वसाहत या ठिकाणी तसेच आदई गावात मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले पाहायला मिळाले.



इमारतीच्या आवारात दोन फूट पाणी साचल्याने वाहनचालकांना त्याचा फटका बसला. रविवार असून नागरिकांना काळजीपोटी बाहेर पडता आले नाही. दरम्यान, काहींनी मात्र विकेंड चांगलाच एन्जॉय केलेला पाहण्यास मिळाला. रविवारी रात्रभर कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे कळंबोली वसाहत पूर्णतः जलमय झाली. तीन ते साडेतीन फूट उंचीपर्यंत पाणी साचल्याने अनेकांच्या घरातही पाणी शिरले. एलआयजी भागातील नागरिकांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे घबराटीचे वातावरणही निर्माण झाले. रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या मोटरसायकल व चारचाकी वाहनेही पाण्यात बुडाल्याने त्यांचेही लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अनेकांनी आपल्या रिक्षा व दुचाकी सुरक्षितस्थळी ठेवल्या.

कळंबोलीतील सप्तशृंगी माता मंदिर, विठ्ठल रुक्माई मंदिर, सेंट जोसेफ हायस्कूल परिसर, कार्मेल हायस्कूल, करांवली नाका, सुधागड हायस्कूल, स्टेट बँक जवळील भाग हा सर्व जलमय झाला. पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पाण्याचा निचरा झाला. **(पान २ वर..)**

### शहापूर, मुरबाडमध्ये रस्ते जलमय; नद्यांना पूर

**ठाणे :** जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे मुरबाडहून वाशिंदकडे जाणाऱ्या रस्त्यावरील चिखले गावातील काळू नदीवरील पूल पुराच्या पाण्याखाली गेला आहे. या पाण्याच्या वाढलेल्या प्रवाहामुळे शहापूर तालुका आणि मुरबाड तालुक्यातील सुमारे १८ गाव-पाड्यांचा संपर्क पहाटेपासून तुटला आहे. काळू नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली असून डोंगर भागातील घाट माथ्यावर सततच्या पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे नदीच्या पातळीत वाढ झाल्याचे सांगण्यात आले आहे.

### कर्जतच्या उल्हास नदीवरील दहिवली पूल पाण्याखाली

**नेरळ :** कर्जत तालुक्यात मागील चोवीस तासांत झालेल्या मुसळधार पावसाने अनेकांना झोडपून काढले आहे. त्यातच सततधार पडणाऱ्या या पावसामुळे नेरळ कळंब या राज्य मार्गावरील उल्हास नदीवर दहिवली पूल हा पाण्याखाली गेल्याने येथील चाळीस ते पन्नास गाव वाड्यांच्या संपर्क तुटला होता. दरम्यान, पावसाचा जोर कमी झाल्याने नदीच्या पाण्याची पातळी कमी होऊन येथील राज्यमार्गावरील वाहतूक सेवा पूर्ववत सुरळीत सुरू झाली आहे. **(सविस्तर पान २ वर..)**

### वरळीतही हिट ॲण्ड रनचा प्रकार

# सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही -मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई : प्रतिनिधी**





वरळी येथून हिट ॲंड रनच्या घटनेमुळे मुंबई हादरली आहे. कोळी दाम्पत्य मच्छी आणण्यासाठी ससून डॉक येथे गेले होते. मच्छी घेऊन परतत असताना रविवारी (दि. ७) पहाटे ५.३०च्या सुमारास भरधाव कारने या दाम्पत्याला धडक दिली. वरळीच्या अटरिया मॉल परिसरात ही घटना घडली. यामध्ये महिलेचा मृत्यू झाला आहे. तर पती जखमी झाला आहे. याप्रकरणी आरोपी चालक हा शिवसेनेचे पालघरमधील उपनेते राजेश शहा यांचा मुलगा मिहीर शाह असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी आरोपी मिहीर शाह आणि चालक दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुंबईत झालेला अपघात हा दुर्दैवी आहे. या घटनेत जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. या घटनेतील आरोपी कोणीही असू दे, सरकार त्याला पाठीशी घालणार नाही. या सरकारमध्ये कायदा सर्वांसाठी समान आहे. मग, तो कुठल्याही पक्षाचा पदाधिकारी व कार्यकर्ता असो. सरकार आणि कायद्यापुढे सर्व समान असल्याची आमची भूमिका आहे. त्यामुळे वरळीत घडलेल्या घटनेला आम्ही काही वेगळा न्याय देणार नसून जे होईल ते कायद्यानुसारच होईल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे. गृह विभाग नक्कीच योग्य त्या उपाययोजना करतील, असे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहे.

#### दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

दरम्यान, वरळीतील हिट ॲण्ड रन प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. याप्रकरणी शिवसेनेचे उपनेते राजेश शहा यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अपघात झाला त्यावेळी राजेश शाह यांचा मुलगा मिहीर शाह गाडी चालवत होता. पोलिसांनी मिहीर शाह आणि चालक दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### विठूरायाचे व्हीआयपी, ऑनलाईन दर्शन बंद



**पंढरपूर :** सावळ्या विठूरायाच्या आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी आता २४ तास उभा राहणार आहे. ७ ते २६ जुलैपर्यंत या कालावधीत विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन २४ तास राहणार आहे. आता रोज पायावर ५० हजार तर मुखदर्शनातून ५० ते ६० हजार भाविकांना दर्शन मिळू शकणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. याशिवाय संपूर्ण दिवस रात्र विठूराया आपल्या लाडक्या भक्तांना दर्शन देत उभा असणार आहे.

### निवडक

#### चकमकीत चार दहशतवादी ठार; दोन जवान शहीद

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात शनिवारी रात्री भारतीय लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत चार दहशतवादी मारले गेले असून दोन जवान शहीद झाले असल्याची माहिती सैन्यातील अधिकाऱ्यांनी दिली आहे. शहीदांमध्ये अकोला जिल्ह्यातील २४ वर्षीय जवान प्रवीण जंजाळ यांचाही समावेश असल्याचे सांगितले आहे.

#### महिलेला वाचवण्यासाठी गेलेल्या चार मुलींचा मृत्यू

**आग्रा :** येथील थाना खंदौली परिसरातील यमुना एक्सप्रेसवे इंटरचेंजजवळ मोठी दुर्घटना घडली आहे. एक्सप्रेस वे इंटरचेंजजवळच्या एका तलावात आठ मुले आणि एक महिला डूबली. या सर्वांना बाहेर काढण्यात आले आणि रुग्णालयात दाखल करण्यात आले. खंदौली थान्याचे पोलीस निरीक्षक राकेश चौहान यांनी सांगितले की महिला आणि चार मुलांना वाचवण्यात आले, मात्र चार मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला. या मुलींची वय ११ ते १२ वर्षे होती.

## सूरतमध्ये इमारत कोसळून सात जणांचा मृत्यू



**सूरत : प्रतिनिधी**

सूरतमध्ये सहा मजली इमारत कोसळून सात जणांचा मृत्यू झाला. या ठिकाणी ढिगारा उपसण्याचे काम सुरू आहे. काही लोक अडकले असण्याची भीती या ठिकाणी व्यक्त करण्यात येते आहे. गुजरातच्या सूरतमध्ये ही घटना घडली आहे. या ठिकाणी मदत आणि बचावाकार्य सुरू आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ या दोन्हीची पथके या ठिकाणी कार्यरत आहेत.

घटनेची माहिती मिळताच सूरत महापालिकेचे महापौर दक्षेज मावानी, उपमहापौर नरेंद्र पाटील, भाजप आमदार संदीप देसाई आणि विरोधी पक्षाच्या नेत्या पायल साकरिया यांच्यासह इतर नेत्यांनीही घटनास्थळाला भेट दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सूरतमधल्या साचिन भागात सहा मजली इमारत कोसळली. या घटनेत सात जणांचा मृत्यू झाला. मदत आणि बचावकार्य सुरू असून ढिगाऱ्याखाली लोक अडकले असण्याची भीती आहे. आत्तापर्यंत तीन मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

सूरत अग्निशमन दलाचे अधिकारी बसंत पारीक म्हणाले, आम्ही रात्रभर शोध मोहीम राबवली. दोन महिलांचा आवाज आम्हाला येत होता. त्यानंतर एका महिलेला जिवंत बाहेर काढण्यात यश आलं आहे. तर सात जणांचे मृतदेह आत्तापर्यंत आढळले आहेत. आत्तापर्यंत या घटनेत कुणीही बेपत्ता आहे, अशी माहिती समोर आलेली नाही. आम्ही तरीही शेजारी असलेल्या इमारतींमध्ये चौकशी करत आहोत.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ‘कल्पतरू’मध्ये सौरऊर्जा प्रणालीचे अनावरण

### सर्व स्तरांतून संकल्पनेचे कौतुक





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शाश्वत उर्जा पद्धतींसाठी एक ऐतिहासिक कामगिरी म्हणून पनवेलमधील कल्पतरू रिव्हरसाईड हाउसिंग सोसायटीच्या इमारत क्रमांक ३ व ४मध्येही सौरऊर्जा प्रणाली बसवण्यात आली आहे. या प्रणालीचे अनावरण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. ७) झाले.

कल्पतरू सोसायटीमध्ये बसवण्यात आलेली सौरउर्जा प्रणाली ही ३०० किलोवॅट क्षमतेची असून केवळ पनवेलमध्येच नाही तर संपूर्ण नवी मुंबईतील सर्वांत मोठी आहे. हा प्रकल्प इंजिनिअरिंगने तीन महिन्यांच्या विक्रमी वेळेत अंदाजे एक कोटी २० लाख रुपये खर्चून पूर्ण केला आहे. यामुळे वीज बिलांवर सुमारे ७० लाख रुपयांची वार्षिक बचत होणार आहे.

सोसायटी क्रमांक ३ व ४चे अध्यक्ष ब्रम्हाजी गोडापाटी, सोसायटी क्रमांक १ व २ चे अध्यक्ष प्रशांत ठाकूर, सोसायटी क्रमांक ३ व ४चे सचिव विनीत मित्तल, कोषाध्यक्ष राहुल घोडके आणि समर चौहान, समिती सदस्य आशिष उभान, गुरुनाथ पाटील, पराग ठाकूर, महेश महेश्वरी, सीमा ठाकूर, स्वाती शेट्टी, विजीता तांबोळी, सीमा ठाकूर, योगेश खैरनार, भार्गव ठाकूर, संजय भगत, वैभव देहमुख, मनोज आंग्रे, मकरंद जाधव, ब्रह्मदेवाचा अभिषेक, नितीन ठाकूर, रवी म्हात्रे, संदीप साळुंके, शांताराम नाईकडे व इतर समिती सदस्य उपस्थित होते.

# डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे वृक्षारोपण

### सचिनदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते मोहिमेची सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

पद्मश्री डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या पुण्यतिथीनिमित्त डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी (दि.७) दत्त टेकडी कुरूळ येथे प्रतिष्ठानचे प्रमुख सचिनदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते वृक्ष लागवड मोहिमेची सुरुवात करण्यात आली.

पद्मश्री डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांची ८ जुलै रोजी पुण्यतिथी असते. त्यानिमित्ताने डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडाच्या वतीने दत्तटेकडी कुरूळ येथे वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानचे प्रमुख सचिनदादा धर्माधिकारी यांच्या हस्ते



वृक्ष लागवड करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या वेळी राहुलदादा धर्माधिकारी, स्वरूपा धर्माधिकारी, स्वराली धर्माधिकारी, अन्विता, आराध्या, अक्षरा, श्रीयन यांनीही वृक्ष लागवड केली.

या वेळी सचिनदादा धर्माधिकारी यांनी उपस्थित **(पान २ वर..)**

## चारधाम यात्रा स्थगित

### उत्तराखंडमध्ये पावसाचा रेड अलर्ट

**उत्तराखंड : वृत्तसंस्था**

उत्तराखंडमध्ये रविवारी (दि. ७) भारतीय हवामान विभागाने पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांनी चारधाम यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. याबाबतचे वृत्त पीटीआयने दिले आहे. उत्तराखंडच्या गढवाल भागात अतिवृष्टीचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे गढवालचे आयुक्त विनय शंकर पांडे यांनी सांगितले की, यात्रेकरूंच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून चारधाम यात्रा पुढे ढकलण्यात आली आहे.

गढवाल विभागात ७ आणि ८ जुलै रोजी मुसळधार पावसाचा हवामान विभागाने दिलेला अंदाज पाहता, सर्व भाविकांना ७ जुलै रोजी ऋषिकेशच्या पलीकडे चारधाम यात्रेला न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे, असे विनय शंकर पांडे यांनी म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून उत्तराखंडमधील अनेक भागात मुसळधार पाऊस पडत आहे. यामुळे डोंगर भागात भूस्खलन झाले आहे. परिणामी, टेकड्यांवरून ढिगारा खाली कोसळल्याने बद्रीनाथकडे जाणारा महामार्ग अनेक ठिकाणी बंद झाला आहे.

# दोन एसटी बसच्या धडकेत ३६ जण जखमी

### अलिबाग-रेवदंडा मार्गावरील घटना

**अलिबाग : प्रतिनिधी**

दोन एसटी बसची समोरासमोर धडक होऊन ३६ जण जखमी झाले. जखमींमध्ये दोन्ही बसच्या चालक, वाहकांचा समावेश आहे. जखमींवर अलिबाग येथील जिल्हा शासकिय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. अलिबाग-रेवदंडा मार्गावर आक्षीजवळ हा अपघात रविवारी (दि. ७) सकाळी घडला. अपघातामुळे वाहतूक कोंडी झाली होती, त्यामुळे पर्यायी मार्गाने वाहतूक वळवण्यात आली होती.

रविवारी सकाळी अलिबाग आगाराची अलिबाग-रेवदंडा ही एसटी बस अलिबाग आगारातून रेवडांड्याकडे जाण्यास निघाली होती. मुरूड आगाराची मुरूड-भांडुप ही एसटी अलिबागच्या दिशेने येत होती. दोनही बस अलिबागपासून सुमारे चार ते पाच किमी अंतरावरील नवेदर बेली ते आक्षी गावादरम्यानच्या वळणावर आल्या असता दोन बसेसी समोरासमोर धडक झाली. यात ३६ जण जखमी झाले. नागनाथ रामचंद्र धुरे (अलिबाग-



रेवदंडा बस चालक), सतीष पांडुरंग सूर्यवंशी (अलिबाग-रेवदंडा बसचे वाहक), अलिमभाई सय्यद (वय ३३, मुरूड-भांडुप बस चालक) जूबर अहमद कमलुद्दीन शेख (वय ३३, मुरुड-भांडुप बस वाहक) यांचा जखमींमध्ये समावेश आहे

अलिबाग रेवदंडा बसवरील चालक व वाहक तसेच मुरूड-भांडुप बसवरील चालक हे गंभीर जखमी झाले. तर वाहक किरकोळ जखमी झाला. अपघातची महिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटना स्थळावर धाव घेऊन जखमींनी तातडीने अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात दाखल केले. किरकोळ जखमींना उपचारनंतर सोडण्यात आले.

# लहान बाळासारखे किती दिवस रडणार?

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना सवाल

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगरमध्ये उद्धव ठाकरेंनी रविवारी (दि.७) शिवसंकल्प मेळावा घेतला. या मेळाव्यात 'गद्दार' असा उल्लेख करीत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर टीका केली, तसेच तुम्ही शिवसेनेचे चिन्ह चोरले, पक्ष चोरला आणि माझ्या वडिलांचे नाव चोरून निवडून आलात, अशी टीका पुन्हा एकदा केली. त्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनीही, लहान मुलासारखे किती दिवस रडणार आहात? असा सवाल करीत उद्धव ठाकरेंना टोला लगावला.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, किती दिवस लहान बाळासारखे रडणार? ग्रामपंचायतीत लोकांनी त्यांना सहाव्या नंबरवर टाकले. आमच्या शिवसेनेला जी बाळासाहेबांचे विचार मानते ती दुसऱ्या क्रमाकांवर होती. लोकसभा निवडणुकीतही लोकांनी दाखवून दिले. आम्हाला जास्त मते मिळाली. १९ टक्क्यांपैकी १४ टक्के मते आमच्याकडे आली आहेत. पक्ष चोरला, चोरला हे किती वेळा बोलणार? लोकांनी सिद्ध केले आहे की, त्यांनी (उद्धव ठाकरे) बाळासाहेबांचे विचार सोडले. आम्ही १३ जागा उबाठाच्या समोर लढलो सात जिंकून आलो. त्यांच्यापेक्षा दोन लाख मते जास्त आम्हाला मिळाला. त्यांचा स्ट्राईक रेट ४२ टक्के होता आमचा ४७ टक्के होता.

लोकसभेला ज्या जागा तुम्हाला (मविआ) कशा मिळाल्या, कुणामुळे मिळाल्या, कुठल्या व्होट बँकमुळे मिळाल्या ते महाराष्ट्राला माहीत आहे. मूळ मतदार आमच्याबरोबर आहे याची प्रचिती आता विधानसभेत त्यांना (उद्धव ठाकरे) येईल. विधानसभेत इतकी घसरण होईल की त्यांना कळेल की आपण काय चूक केली. अभद्र आघाडी केल्याचा परिणाम त्यांना भोगावा लागेल. जे गेटच्या बाहेर येत नव्हते ते आता शेतकऱ्यांना बांधावर जाऊन भेटू लागलेत याचा आनंद आहे. महिला भगिनींना आम्ही जे १५०० रुपये देण्याची योजना आणली आहे, तीन सिलिंडर मोफत ही योजना आणली ती भाऊबीज आहे, रक्षाबंधनाची भेट आहे. सन्मानाची भेट आहे. तुम्ही कधी काही दिले नाही. तुमची देण्याची दानतही नाही. त्यामुळे ही योजना कायमस्वरुपी आहे. पापाचा घडा कुणाचा भरला ते विधानसभेला जनता ठरवणार आहे. त्यांचे अडीच वर्षांचे काम बघा, आमचे दोन वर्षांचे काम पाहा, जनता तुलना करेल, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंच्या टीकेला उत्तर दिले.

# रायगड खोऱ्यात मुसळधार पाऊस

## पुन्हा एकदा रायगड विभागाचा संपर्क तुटला

**महाड : प्रतिनिधी**

रायगड खोऱ्यात रविवारी (दि.७) दिवसभरात मुसळधार पाऊस कोसळल्याने गांधारी आणि मांडले नदीची पाणीपातळी वाढली. यामुळे लाडवली येथील पर्यायी मार्ग पाण्याखाली गेल्याने पुन्हा एकदा रायगड विभागाचा संपर्क तुटला आहे. पुलाचे काम पूर्ण होण्यासाठी अजून एक महिला लागणार असून, येत्या जुलैचा पाऊस पाहता रायगडवासियांचे धाबे दणाणले आहेत.



किल्ले रायगड महामार्गावरील लाडवली येथील पूल आजही अर्धवट असून रविवारी कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे पर्यायी मार्ग पाण्याखाली गेल्याने किल्ले रायगडची वाहतूक बंद झाली. त्यामुळे नागरिक आजही याला जबाबदार ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त करीत आहेत. एकंदर पुलाच्या कामाची गती पाहता हा पूल पूर्ण होण्यासाठी आजही एक महिना तरी लागणार आहे. पुलाचे २८ गर्डर जरी बसवून झाले असले तरी पुलाचे स्लॅप आणि कठड्याचे काम होणे बाकी आहे, तसेच दोन्ही बाजूचा जोडमार्ग व त्याच्या काँक्रीट भिंतीचे काम बाकी आहे. अपुरे कुशल कामगार व मनुष्यबळ यामुळे येत्या जुलै महिन्यात हा पुल वाहतुकीसाठी खुला होईल, असे वाटत नाही.

यासाठी मोहोप्रे-आचळोली या पर्यायी मार्गावर वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवासी या मार्गाने जाण्याचे टाळत आहेत. जुलै महिन्यात होणारी अतिवृष्टी आणि निर्माण होणारी पूरपरिस्थिती पाहता सलग आठ-दहा दिवस किल्ले रायगड महामार्ग बंद राहू शकतो. त्यामुळे आता रायगडवासियांचे खऱ्या अर्थाने धाबे दणाणले आहेत.

# नेरळ-दहिवली पूल पाण्याखाली

## पावसाचे प्रमाण झाल्यानंतर वाहतूक पूर्ववत

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात मागील २४ तासांत झालेल्या मुसळधार पावसाने नेरळ-कळंब या राज्यमार्गावरील उल्हास नदीवर दहिवली पूल पाण्याखाली गेल्याने येथील ४० ते ५० गाववाड्यांचा संपर्क तुटला होता. पावसाचा जोर कमी झाल्याने नदीच्या पाण्याची पातळी कमी होऊन येथील राज्यमार्गावरील वाहतूक सेवा पूर्ववत सुरळीत सुरू झाली आहे.



कर्जत तालुक्यात मागील २४ तास मुसळधार पाऊस कोसळत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. बारमाही वाहणारी उल्हासनदीकाठची शेती काही पाण्याखाली आली तर नेरळ-कळंब राज्यमार्गदेखील काही तास पाण्याखाली आला होता. दहिवली पुलावर रविवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास पाणी वर येऊन पूल काही तास पाण्याखाली गेला होता.त्यामुळे हा मार्ग काही काळ वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. दोन गावांना जोडणाऱ्या या नदीवरचा पूल पाण्याखाली आल्याने येथील दहिवली येथून पुढील ४० ते ५० गाववाड्यांचा संपर्क तुटला होता. सकाळी ७ वा. च्या सुमारास पावसाचा जोर ओसरल्याने पूल वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला.

# मोर्बे धरण परिसरात पावसाची प्रतीक्षा

**नवी मुंबई : बातमीदार**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोर्बे धरण परिसरातही यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे शहरावर पाणीकपातीचे संकट ओढावले आहे. यंदाच्या पावसाळ्यात मोर्बे धरण परिसरात ९ जूनला पावसाला सुरुवात झाली. आतापर्यंत मोरबे धरणात ७७४.६० मिमी. पावसाची नोंद झाली आहे.

यंदाच्या पावसाळयात पावसाने ओढ दिल्यामुळे नवी मुंबईकरांचे डोळे पावसाकडे लागलेले आहेत. धरण परिसरात थोड्याफार प्रमाणात पाऊस पडत असला, तरी अजूनही पावसाचा जोर कमीच आहे. परंतु मागील २४ तासांत रविवारी सकाळी साडेआठ वाजेपर्यंत एका दिवसात १२३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यापूर्वी २० जूनला ११७.४० मिमी पावसाची नोंद झाली होती. यंदाच्या पावसाळ्यात ७७४.६० मिमी पावसाची नोंद झाली असली तरी गेल्या वर्षीच्या तुलनेत धरणात पाणीसाठा कमी आहे. गेल्या वर्षी धरणात ३२.६० टक्के पाणीसाठा होता तर आता धरणात ३१.०८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, असे आवाहन करण्यात येत आहे,

# पळचिल येथील विद्यार्थ्यांनी घेतला भातलावणीचा आनंद





**पोलादपूर : प्रतिनिधी**

आंबवडे सैनिक विकास मंडळ संचलित स्व. शांताराम शंकर जाधव न्यू इंग्लिश स्कूल, पळचिल विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहशालेय उपक्रमांतर्गत दप्तराविना शाळा अनुभवताना शनिवारी (दि.७) विद्यार्थी व शिक्षकांनीही भातलावणीचा आनंद लुटला.

शेतातील आवन कसे काढावे, नांगरणी कशा पद्धतीने केली जाते, शेती मशागतीची पद्धत, भात लावण्यासाठी पावसाच्या पडणारे पाणी शेतात किती प्रमाणात आवश्यक असते, भात लावण्यासाठी किती प्रमाणात चिखल केला जातो, आधुनिक पद्धतीने शेती कशी केली जाते, याविषयी विद्यालयाचे शिक्षक प्रल्हाद चिविलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही भातलावणीचा आनंद घेतला. विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय जैतपाल, शिक्षक प्रल्हाद चिविलकर, महिपत कोकरे, ज्योती गीते आदी शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसमवेत सहभागी होऊन भात लावणीच्या उपक्रमात सहभाग घेतला.

# कर्जतमध्ये भाजपच्या परिवर्तन हेल्पलाईन ॲपचा शुभारंभ

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

भाजप कर्जत-खालापूर विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांच्या संकल्पनेतून रविवारी (दि.७) कर्जत येथे विधानसभा कार्यकर्ता समिती बैठकीत परिवर्तन हेल्पलाईन ॲपचा शुभारंभ करण्यात आला.






समाजातील सर्व घटकापर्यंत पोहचून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी या ॲपचा उपयोग होईल. कर्जत, नेरळ, माथेरान, खोपोली, खालापूर, वावोशी या ठिकाणी कार्यालय होणार आहेत, अशी माहिती विधानसभा निवडणूक प्रमुख या वेळी किरण ठाकरे यांनी दिली. लाडकी बहीण योजना तसेच आपल्या गावातील शहरातील असणाऱ्या समस्यांसाठी या हेल्पलाईन नंबरवर (९११९४४९०९९) संपर्क करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी आमदार सुरेश लाड, जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे, जिल्हा उपाध्यक्ष सनी यादव, कर्जत-खालापूर विधानसभा संपर्क प्रमुख प्रल्हाद केणी, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, कर्जत मंडळ अध्यक्ष राजेश भगत, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सभापती नरेश पाटील, सुनील गोगटे, भाजप खालापूर शहर अध्यक्ष दिपक जगताप, काशिनाथ पार्टे, बिनिता घुमरे, स्नेहा गोगटे, गायत्री परांजपे, संजय कराले, ऋषिकेश जोशी आदी कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# चिरनेरच्या अक्कादेवी धरणावर गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील अक्कादेवी धरणाच्या धबधब्यावर फेसळणाऱ्या पाण्यात मजा लुटण्यासाठी पावसाळ्यात दरवर्षी चिरनेर येथील अक्कादेवीच्या माळरानावर जुलै महिन्यात पर्यटकांच्या आनंदाला पारावार उरत नाही. यंदा पावसाची समाधानकारक बरसात झाली, मात्र उरण तालुक्यात पाच- सहा दिवसांत पाऊस सक्रिय झाल्याने चिरनेर येथील अक्कादेवी येथील तीन डोंगराच्या कुशीत असलेल्या धरणात पाणी ओसांडून वाहू लागले आहे.



या परिसरात पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढू लागली आहे. नवी मुंबई, पनवेल आणि उरण तालुक्यातील पर्यटकांना काही अंतरावर असलेल्या या अक्कादेवी धरणावरील धबधब्यावर मौजमजा करण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने आणि येण्या-जाण्यासाठी विशेष अडचणी निर्माण होत नसल्याने या ठिकाणी पावसाळ्यात पर्यटक येण्याला पसंती देत आहेत.

पान १ वरून

### मुसळधार पावसाने झोडपले!

स्थानिक माजी नगरसेवकांनी सिंग हॉस्पिटलजवळ धाव घेऊन मोटर पंप सुरू करण्यास मदत केली. त्यामुळे पाण्याचा निचरा नंतर होऊ लागला. यातच पावसाच्या रेट्याने कळंबोलीतील शिवसेना शाखेजवळ एक मोठे झाड उभ्या असलेल्या गाडीवर पडल्याने मोठे नुकसान झाले, मात्र अग्निशामक दलाच्या जवानांनी तत्परता दाखवून कोसळलेले झाड त्वरित कापून बाजूला करून रस्ता मोकळा करून घेतला.

पडघे गावाजवळून वाहणाऱ्या कासाडी नदीला पूर आल्याने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. पूराच्या पाण्यात अनेक गाड्या वाहून गेल्या आहेत. कासाडी नदीचे पाणी पनवेल शहरात अनेकांच्या घरात शिरल्याने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

### डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे वृक्षारोपण

श्रीसदस्यांना मार्गदर्शन करताना आंबा, कदंब, उंबर, काजू, वड, पिंपळ, आवळा, करंज यासारखी झाडे लावण्याचे आवाहन केले. दरवर्षी असह्य होत जाणारे तापमान, वाढत जाणारे प्रदूषण आणी त्याच वेगाने होणारी वृक्षतोड या सर्वांवर खूप वर्षे तग धरणारी वृक्ष लागवड आणि त्याचे संवर्धन हा एक प्रभावी आणि शाश्वत मार्ग आहे. त्यादृष्टीने वृक्ष लागवड, त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे तसेच नुसते झाडे लावून उपयोग नाही तर त्याची निगा राखताना त्यांना वेळीच खते, औषधे व पाणी घातले पाहिजे, असे सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये घुसखोर ४२ बांगलादेशींचे भारतीय पासपोर्ट रद्द

**पिंपरी- चिंचवड : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे घुसखोरी करून बांगलादेशी राहत असल्याचे अनेकदा उघड झाले आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय पासपोर्ट देखील त्यांच्याकडून हस्तगत केल्याची अनेक उदाहरणे आहेत. पिंपरी-चिंचवड एटीबीने (दहशतवादविरोधी पथकाने) ४२ घुसखोर बांगलादेशींचे भारतीय पासपोर्ट रद्द करण्यात यश मिळवले आहे.

जानेवारी महिन्यात एटीबीला निगडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच बांगलादेशी राहत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. निगडी पोलिसांनी त्यांचा शोध घेऊन त्यांना अटक केली होती. याच दरम्यान, त्यांच्या संपर्कात असलेल्या पासपोर्ट एजंटचीदेखील चौकशी पोलिसांनी केली. २०१५ पासून तो पासपोर्ट एजंट बांगलादेशीच्या संपर्कात होता. पोलिसांनी माहिती घेऊन आणि मोबाईलच्या आधारे ४२ बांगलादेशींचे पासपोर्ट रद्द करण्यासाठी प्रादेशिक पासपोर्ट ऑफिस पुणे यांना पिंपरी-चिंचवड एटीबी, परदेशी नागरिक नोंदणी विभाग आणि विशेष शाखा-२ यांच्या मदतीने पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यांना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली होती.

४२ पासपोर्ट हे बनावट कागदपत्रांच्या आधारे बनवण्यात आले होते. हे प्रकरण अत्यंत संवेदनशीलपणे हाताळून पुणे पासपोर्ट ऑफिसने ४२ बांगलादेशी घुसखोरांचे भारतीय पासपोर्ट रद्द केले आहेत. या सर्व प्रकियेला सहा महिने लागले आहेत. ही कामगिरी पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# सीवूड्समध्ये घराचे संपूर्ण प्लास्टर कोसळले

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूडस् सेक्टर ४८मधील न्यू ओमकार को. ऑप. हाऊसिंग सोसायटी डी२४/४मधील मरगज यांच्या बेडरूममधील संपूर्ण प्लास्टर रविवारी (दि.७) दुपारी १२:३० वा. पूर्णपणे कोसळले. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली असून, सिडकोच्या धोकादायक इमारतींचा प्रश्न उभा ठाकला आहे.


रविवारी दुपारच्या सुमारास मरगज यांच्या घरात मोठा आवाज झाला. हॉलमध्ये असणारे मरगज कुटुंबीय आतमध्ये पाहण्यासाठी धावले असता, बेडरूममधील छताचे संपूर्ण प्लास्टर कोसळले होते. यात पंखा, फर्निचर तसेच इतर वस्तूंचे नुकसान झाले. पलंगावर संपूर्ण प्लास्टरचा ढीग साचला होता. सुदैवाने त्या वेळी पलंगावर कोणी नव्हते.



स्थानिक माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी तातडीने धाव घेत पालिका व सिडकोला या घटनेबाबत माहिती दिल्याचे भाजपचे आनंद कुंभार यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांसमोर महाराष्ट्र भवनाचे सादरीकरण

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नांना यश



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबईमध्ये महाराष्ट्र भवन व्हावे अशी गेल्या अनेक वर्षापासून आमदार मंदा म्हात्रे यांची मागणी होती. त्यासाठी सातत्याने त्या पाठपुरावा करीत आहेत. त्या प्रयत्नांना यश येताना दिसत आहे. महाराष्ट्र भवनासंदर्भात अनेक वर्षापासून शासन दरबारी पाठपुरावा सुरू होता या अनुषंगाने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मुंबई येथील विधीमंडळातील दालनात महाराष्ट्र भवन प्रकल्पाचे अंतरिम सादरीकरण करण्यात आले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमवेत सिडको व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, मुख्य कार्यकारी अभियंता शिला करुणाकर, अधीक्षक अभियंता अर्जुन अनोसे, वास्तूविशारद हितेन शेट्टी, अभियंत्या तेजस्विनी पंडित व इतर संबंधित अधिकार उपस्थित होते. या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, नवी मुंबईमधील वाशी येथे महाराष्ट्र भवन संकल्पित चित्रामध्ये काही किंचित फेरबदल करून लवकरात लवकर भव्यदिव्य असे महाराष्ट्र भवनाची निविदा प्रक्रिया पूर्ण करावी.

तातडीने भूमिपूजन करून बांधकामाला सुरुवात करावी, असे आदेश सिडको व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल व संबंधित अधिकाऱ्यांना अजित पवारांनी दिले.

# मुसळधार पावसाने कळंबोली जलमय

## पाणी खेचणारे मोटरपंप बंद, नागरिकांचे नुकसान





**कळंबोली : प्रतिनिधी**

अनेक दिवसाच्या प्रतीक्षेनंतर मान्सून सक्रिय झाल्याने धो-धो कोसळणाऱ्या पावसाने रविवारी (दि.७) कळंबोलीकरांची त्रेधा तिरपीट उडाली. मुसळधार पावसाने कळंबोली वसाहत पूर्णतः जलमय झाली. साचलेले पाणी खेचण्यासाठी बसवण्यात आलेले मोटरपंप बंद राहिल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला.

शनिवारी रात्रभर कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे कळंबोली वसाहत पूर्णतः जलमय झाली. वसाहतीमधील साचलेले पाणी खेचण्यासाठी बसवण्यात आलेले सिंग हॉस्पिटलजवळील पंप हे रात्रभर बंद राहिल्याने पाणी कळंबोली वसाहतीत पाणी साचले. अनेकांच्या घरातही पाणी शिरले. एलआयजी भागातील नागरिकांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे घबराटीचे वातावरणही निर्माण झाले. रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या मोटरसायकल व चारचाकी वाहनही पाण्यात बुडाल्याने त्यांचेही लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. पाणी साचू नये यासाठी कळंबोलीत २३ ठिकाणी पाणी खेचण्यासाठी मोटरपंप तैनात केले आहेत, मात्र सिंग हॉस्पिटलजवळील मोटर पंप बंद राहिल्याने पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. कळंबोलीतील सप्तशृंगी माता मंदिर, विठ्ठल रखुमाई मंदिर, सेंट जोसेफ हायस्कूल परिसर, कार्मेल हायस्कूल, करांवली नाका, सुधागड हायस्कूल, स्टेट बँकेजवळील भाग हा सर्व जलमय झाला.

### तळोजा वसाहतीत कंपन्यांमध्ये पाणी

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये पावसाळ्यापूर्व करावयाची नालेसफाई व अन्य साफसफाई एमआयडीसी प्रशासनाने न केल्यामुळे त्याचा फटका रविवारी झालेल्या मुसळधार पावसाने कारखानदारांना बसला आहे. प्रचंड प्रमाणात पाणी कारखान्यात घुसले. कारखान्यातील मशिनरीही बंद पडली. कोणती अघटीत घटना घडू नये म्हणून एमआयडीसीकडून वीजपुरवठा खंडित करण्यात आला. अचानक झालेल्या वीजपुरवठा खंडितमुळे करोडो रुपयाचे नुकसानीचा फटका कारखानदारांना बसला आहे. याबाबत तळोजा एमआयडीसी प्रशासन मुख्य कार्यकारी अभियंता एन. जी. ननावरे यांनी सांगितले की, जिथे जिथे पाणी साचले तिथे आम्ही भेट देऊन पाण्याचा निचरा होण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. एकीकडे पर्जन्यवृष्टी होत असताना दुसरीकडे २ वा. पर्यंत पाण्याचे भरती असल्याने पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. एमआयडीसी प्रशासनाने चांगल्या प्रकारे नालेसफाई केलेली आहे, असे सांगितले.

**मुसळधार व अचानक वाढलेल्या पावसाच्या बरसण्याने कळंबोलीत पाणी साचले आहे. पाणी खेचण्यासाठी बसवण्यात आलेले पंप हे सिडकोच्या माध्यमातून कार्यान्वित असून ते सुरूही आहेत. तरीसुद्धा महापालिका प्रशासन पाण्याचा निपटारा करण्यासाठी सज्ज असून नागरिकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.**

**-डॉ. वैभव विधाते**, उपायुक्त, पनवेल महापालिका

# पनवेल महापालिकेतर्फे आपत्कालीन कार्य सुरू

## तात्पुरता निवारा केंद्र कार्यरत



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रात शनिवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे. रविवार (दि.७) सकाळी ७ वा. पर्यंत सुमारे १२१ मिमी पाऊस महापालिका कार्यक्षेत्रात झाला आहे. महापालिकेमार्फत आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या माध्यमातून पूरग्रस्तांसाठी मदतकार्य सुरू करण्यात आले. या कक्षामार्फत एकूण १२०० मनुष्यबळ कार्यरत करण्यात आले आहे.

महापालिका हद्दीतील सर्व प्रभागांमध्ये पाणी साचलेल्या ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी पंपिंग मशीन बसविण्यात आले आहेत. प्रभाग समिती-क पनवेल कार्यक्षेत्रातील पटेल मोहल्ला येथील ७० व कोळीवाडा येथील ९० पूरग्रस्त नागरिकांना स्थलांतरीत करण्यात आले आहे. त्यांना पमपामार्फत चहा, पाणी व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रभाग समिती-ब कार्यक्षेत्रातील रोडपाली आदिवासीवाडीतील ६० घरे पाण्याखाली गेले असून २५० पूरग्रस्त नागरिकांना रोडपाली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. कळंबोली प्रभागामध्ये पाण्याचा निचरा होणेसाठी एकूण २७ ठिकाणी पंप चालू असून त्यामार्फत पाण्याचा निचरा करण्यात आली आहे. येथे ४५० कर्मचारी काम करीत आहेत.

दरम्यान पमपा हद्दीतील पडघे गावातील मुख्य प्रवाहाच्या नाल्यातील पावसाचा प्रवाह कमी झालेला आहे. खारघर प्रभागामध्ये पाण्याचा निचरा होणेसाठी एकूण १४ पंप चालू असून त्यामार्फत पाण्याचा निचरा करण्यात येत आहे. सदर ठिकाणी पनवेल महानगरपलिकेमार्फत कर्मचारी काम करीत आहेत. खारघर प्रभागामधील उपविभाग नावडे विभागात पाण्याचा निचरा होणेसाठी एकूण पाच पंप चालू आहेत. ज्या ज्या ठिकाणी पाण्याचा निचरा होत आहे, त्या त्या ठिकाणी धूर फवारणी व जंतूनाशक पावडर फवारण्यात येत आहे. पनेवल महानगरपालिकेमार्फत वैद्यकीय विभागामार्फत प्रत्येक प्रभागामध्ये वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये महापालिकेचे वैद्यकिय अधिकारी नागरिकांची तपासणी करत आहेत, तसेच या ठिकाणी सुरक्षारक्षक तैनात आलेले आहेत.

### आयुक्तांची विविध ठिकाणी पाहणी

**दरम्यान आयुक्त मंगेश चितळे यांनी पटेल मोहल्ल्यातील भारतनगर, कोळीवाडा विसर्जन घाट याठिकाणी पाहणी केली, तसेच कळंबोलीमध्ये केएलई महाविद्यालयाजवळ होल्डिंग पॉईंट, खाडी रस्ता, कळंबोलीतील सिटी हॉस्पिटल, मुख्य रस्ते अशा विविध ठिकाणांना भेट दिली.**

# मोखाडा महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांचा सेवापूर्ती गौरव

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती




**मोखाडा : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मोखाडा येथील प्राचार्य डॉ. एल. डी. भोर हे सेवानिवृत्त झाले. यानिमित्त महाविद्यालयात सेवापूर्ती समारंभ शनिवारी (दि.७) आयोजित करण्यात आला होता. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांनस पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था व्हाइस चेअरमन वाय. टी.देशमुख, सचिव प्राचार्य एस.टी.गडदे, रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. जे.पी.जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एन. चांदोरे, कार्यक्रमाचे निवेदन डॉ. यशवंत उलवेकर, प्राचार्य डॉ. उज्ज्वला भोर यांच्यासह इतर मान्यवर आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. दरम्यान शाळेच्या परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



# उरण वाहतूक पोलिसांकडून अवजड वाहतूकदारांमध्ये प्रबोधन



**उरण : प्रतिनिधी**

उरण वाहतूक शाखेतर्फे अवजड वाहतूक करणाऱ्या चालकांना वाहतुकीच्या सुरक्षेबाबत प्रबोधनपर मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी वाहनचालकांनी अवजड वाहने चालवितांना सीटबेल्टचा वापर आवश्यक करणे, मोबाईलवर संभाषण न करणे, मद्यप्राशन करून गाडी चालवू नये, याबाबत प्रबोधन करण्यात आले.

उरण वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी जासई, चिर्ले, जांभूळपाडा, वेश्वी, धुतुम, दिघोडे, पागोटेसह गोदाम परिसरातील असलेल्या पार्किंगमध्ये जाऊन वाहतूक सुरक्षेबाबत आवश्यक प्रबोधन केले जात असल्याची माहिती दिली.

# कळंबोली येथे भाजपचे जनसंपर्क कार्यालय सुरू

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे कळंबोली शहर उपाध्यक्ष जोहेब बशीर पटेल यांनी जनतेची सेवा करण्यासाठी कळंबोली येथे जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन शनिवारी (दि.६) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक अमर पाटील, रायगड जिल्हा चिटणीस तथा कळंबोली संपर्क प्रमुख रमेश मुंडे, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, उत्तर रायगड सहकार सेल जिल्हा अध्यक्ष अशोक मोटे, भाजप उत्तर रायगड चिटणीस संदीप म्हात्रे, कळंबोली शहर संपर्क प्रमुख रमेश मुंडे, प्रभाग क्र.८ अध्यक्ष प्रकाश शेलार, प्रभाग क्र. ७ अध्यक्ष चितरंजन शेट्टी, प्रभाग क्र. ९ अध्यक्ष घनश्याम शर्मा, प्रभाग क्र. १० अध्यक्ष राम महानवर, कळंबोली शहर उपाध्यक्ष सुनील ढेमरे, संदीप भगत, आबा घुटुकडे, कळंबोली शहर सचिव तुषार जगदाळे, कळंबोली सेक्टर ई अध्यक्ष पांडुरंग हतेकर, कळंबोली शहर युवा मोर्चा सरचिटणीस निशान गिल, उत्तर रायगड जिल्हा अल्पसंख्यांक सदस्य मजीबुल शाह, प्रभाग क्र. ९ युवा मोर्चा अध्यक्ष लाड्डी सिद्धू, प्रभाग क्र. ९ बुथ अध्यक्ष राजेश पांडे, प्रभाग क्र. ९ शक्तीप्रमुख उमा राव, कळंबोली शहर ओबीसी अध्यक्ष विष्णू गायकवाड यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.







**खारघर : ओडिसातील जगन्नाथपुरी तीर्थयात्रेला जाणे शक्य होत नसलेल्या भाविकांसाठी गेल्या आठ वर्षांपासून महाराष्ट्र ओरिया वेल्फेअर असोसिएशन व जगन्नाथ लोकतारण ट्रस्टतर्फे खारघरमध्ये जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी या रथयात्रेत सहभाग घेतला. त्यांच्यासह भाजपचे जिल्हा चिटणीस बिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, नरेश ठाकूर, मंडल उपाध्यक्ष किरण पाटील, अजय माळी, भाविक उपस्थित होते. गेल्या १५ वर्षांपासून हनीफ कच्छी यात्रेसाठी रथ तयार करीत आहेत.**





**पनवेल : भाजप नेते मदन खारके यांना वाढदिवसानिमित्त उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व उरण तालुकाध्यक्ष रवीशेठ भोईर यांनी रविवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी केळवणे जि. प. विभागीय भाजप अध्यक्ष मंगेश वाकडीकर, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, माजी जि. प. सदस्य विजय भोईर, भाजप पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, शिरढोण ग्रामपंचायत सदस्य विजय भोपी, प्रितेश मुकादम, प्रितम टकले, अनिल टकले, दत्ता मुकादम, भूषण मयूर कदम आदी उपस्थित होते.**





**पनवेल : भिंगारी येथे नव्याने जलकुंभ उभारण्यात येणार आहे. या जलकुंभाच्या कामाचे भूमिपूजन राजिपचे माजी राजेंद्र पाटील यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. या वेळी महानगर पालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत, मोतीलाल कोळी, पनवेल किसान मोर्चाध्यक्ष रुपेश परदेशी, बी.आर. परदेशी, जोम परदेशी, रवी जाधव, काशिनाथ परदेशी, मुकुंद परदेशी, सुरज परदेशी, महेश परदेशी, राजेश परदेशी, महेश परदेशी, जयेश घाटे, रणजित परदेशी, योगेश मांडवकर, गणेश पवार, सुनील माधवी, गोविंद कुंभार आदी उपस्थित होते.**

## संपादकीय


# आनंदवारी!


आषाढ मास सुरू झाला आहे. हा महिना व्रत-वैकल्य, सण सोबत घेऊन येत असतो. यातील एक अवर्णनीय सोहळा म्हणजे पंढरीची वारी. सध्या विविध ठिकाणच्या पालख्या दिंडीसोबत पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहेत. यानिमित्ताने महाराष्ट्रातील वातावरण भक्तीमय बनल्याचे चित्र आहे.

**जाती-धर्माच्या भिंती दूर सारून मानवता धर्माला सर्वश्रेष्ठ मानणारी संतमंडळी हा आपल्या महाराष्ट्राचा अलौकिक ठेवा, तर त्यांनी सुरू केलेली वारी म्हणजे निष्काम भक्तीचा अनोखा अविष्कारच. यातील पंढरीच्या वारीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पंढरीची वारी जयाचिये कुळी।त्याची पायधुळी लागो मज।। असे या पंढरीच्या वारीचे महात्म्य जगद्‌गुरू तुकाराम महाराजांनी कथन केलेले आहे. त्यावरून तिचे धार्मिक, अध्यात्मिक महत्त्व अधोरेखित होते. ज्येष्ठ महिना आला की, वारकऱ्यांना वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. मग खांद्यावर भगव्या पताका, कंठी तुळशीची माळ, कपाळी बुक्का अन् मुखी हरिनामाचा जयघोष करीत लाखो वैष्णवांचा मेळा ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता तहान-भूक विसरून पंढरीची वाट चालू लागतो. या अनुपम्य सोहळ्याचे वर्णन अतिशय सुंदर शब्दांत करण्यात आले आहे. आषाढीची यात्रा आला पर्वकाळ। निघाला संतमेळा पंढरीसी।। पंढरीची वारी हा वारकरी सांप्रदायाचा अविभाज्य घटक असून या वारीला सातशे वर्षांची परंपरा आहे. ज्ञानेश्वर माऊलींच्या आई-वडिलांनी तेराव्या शतकात वारी केल्याचा उल्लेख आढळतो. जगद्‌गुरू तुकाराम महाराज यांचे पूर्वज विश्वंभरबाबाही पंढरीची वारी नित्यनेम करीत असत. २१व्या शतकातही वारीचे महत्त्व अबाधित, किंबहुना ते वाढले आहे. आपल्याला एखादी सहल काढायची तर किती तयारी करावी लागते. सहलीला येणाऱ्यांची संख्या जेवढी जास्त, तेवढा तणावही वाढतो. वारीचे तसे नसते. वारी ठराविक तिथीला निघते. या वारीसाठी कोणाला सांगावा अथवा निमंत्रण नसते. शिवाय वर्गणी किंवा अन्य कसली सक्तीही नसते. असते ती फक्त पांडुरंगाच्या दर्शनाची आत्मिक ओढ. ज्येष्ठातील मृगाच्या सरी बरसल्या की सुरू होतो हा आगळावेगळा प्रवास. वारकऱ्यांच्या या अगम्य उत्साहाबद्दल ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, माझीया जीवीची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।। विठूनामाचा गजर करीत सारे वारकरी नाचत-गात पंढरीकडे प्रयाण करतात. यात कोणालाही त्याची जात, कूळ विचारले जात नाही. दिंडीत फक्त माणुसकीचा अखंड झरा वाहत असतो. एकमेकांच्या सुखदुख:ची वैचारिक देवाणघेवाणही या वारीत होत असते. गेल्या काही वर्षांपासून विविध क्षेत्रांतील उच्चशिक्षित मंडळी आणि युवकही वारीत सहभागी होत आहेत. एवढेच नव्हे तर या वारीने परदेशी व्यक्तींनाही भुरळ घातली आहे. वारीतील हत्ती, घोडे यांचा समावेश असलेले गोल रिंगण हा तर एक नयनरम्य असा नजारा असतो. अशा ह्या अद्वितीय, अवर्णनीय, अदभूत वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांना विठूरायाच्या चरणी नतमस्तक होण्याची आस लागलेली असते. जसजशी पंढरीनगरी जवळ येऊ लागते, तसतशी विठ्ठल दर्शनाची आस वाढत जाते. याचे नेमके वर्णन तुकोबारायांनी केले आहे. ते म्हणतात, भेटी लागी जीवा लागलीसे आस। पाहे रात्रंदिवस वाट तुझी।। सावळ्या विठ्ठलाच्या सगुण, साजिरे रूपाचे दर्शन घेतल्यानंतर आलेली सारी ग्लानी निघून जाऊन आत्मिक अनुभूतीचा साक्षात्कार होतो. मग संपूर्ण पंढरपूर विठूरायाच्या जयघोषाने दुमदुमून जाते. विठुरायाच्या दर्शनानंतर कोणतीच आसक्ती उरत नाही. अशा वेळी जातो माघारी पंढरीराया। तुझे दर्शन झाले आता।। हे तुकाराम महाराजांचे शब्द मुखातून उत्स्फूर्तपणे बाहेर पडतात. अशी ही पायी वारी सध्या सुरू असून ती पंढरपूरला जाणार आहे.**

# कर्जत तालुका म्हणजे पर्यटकांचे माहेरघर

**खबरबात**
**विजय मांडे**





वर्षा सहलीची टूम मध्यम वर्गीय मंडळींनी मागील दशकात सुरू केली. त्यावेळी लोणावळ्यात भुशी धरण आणि माळशेज घाट हिच त्यांची डेस्टिनेशन होती, मात्र कर्जत तालुक्यात असंख्य धबधबे असल्याने व लोकलने कर्जतला येणे स्वस्त व सुरक्षित असल्याने पर्यटक कर्जतच्या धबधब्यांवर येऊन वर्षा सहलीचा आनंद घेऊ लागली. उपनगरीय लोकल मधून सहज लक्ष जाणारा आषाणे येथील धबधबा पुढे वर्षा सहलप्रेमींचा सर्वाधिक आवडता धबधबा ठरला आहे. पर्यटकांची सर्वाधिक पसंती लाभलेल्या धबधब्यावर येण्यासाठी मुंबई मधून टूर आयोजित करण्या पर्यंत आषाणे धबधबा आपल्याकडे सर्वांना आकर्षित करण्यात यशस्वी ठरला आहे, मात्र अपघात होऊ लागल्याने धबधबे व धरणांवर जाण्यासाठी शासनाने बंदी घातली होती. यंदा बंदी आदेश आला नसल्याने धबधब्यांवर पर्यटकांची तोबा गर्दी होत आहे.

वर्षा सहलीसाठी निघणारे नेरळ, वांगणी, भिवपुरी रोड, कर्जत, पळसदरी, खोपोली येथील धबधबे आणि पळसदरी, मोरबे, लोणावळा येथील धरणाचा विचार करतात. सकाळी घरातून निघून सायंकाळी परत येणे शक्य व्हावे, अशी अपेक्षा सर्व वर्षा सहल प्रेमींची असते. माथेरानच्या पायथाशी असलेल्या आदिवशी वाड्यांच्या रांगेतील पावसाचे पाणी खाली घळीमधून खाली कोसळते. त्या आषाणे गावाच्या मागे वन जमिनीमध्ये आषाणे धबधबा आहे. यापूर्वी दरवर्षी पावसाळ्यात काही पर्यटकांचे बळी घेणारा हा धबधबा पर्यटकांसाठी बंद करण्याचा विचार काही वर्षापूर्वी ग्रामस्थांनी केला होता. त्यानंतर वन विभागाने येथे आपली चौकी बनवून वर्षा सहलीसाठी येणाऱ्या पर्यटकां कडून स्वच्छता कर वसूल करण्याचा निर्णय संयुक्त वनव्यवस्थापन समितीकडून घेतला गेला. त्यात दररोज पर्यटकांकडून टाकला जाणारा कचरा, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या उचलल्या जातात आणि मुख्य म्हणजे कर्जत पोलीस ठाण्याचे कर्मचारी तेथे पर्यटकांनी गोंधळ घालू नये म्हणून उपस्थित असतात. त्याचा परिणाम चांगला झाला असून महिला पर्यटकांना आता तेथे त्रास होत नव्हता. दुसरीकडे धबधब्याचे निसर्ग सौंदर्य अनेकदा प्रसन्न करणारे आहे. मुख्य धबधबा हा जेथे डोंगरातून कोसळतो तेथून पुढे तब्बल दीड किलोमीटरचा परिसर जंगलाचा आहे. त्या भागातून धबधब्याचे पाणी खाली येत असल्याने सर्वांना पाण्याच्या पडण्या पर्यंत जाण्याची आवश्यकता पडत नाही. धबधब्याच्या पाण्यासोबत अनेकदा दगड पडण्याची भीती असल्याने तसे फलक लावण्यात आले आहेत. सुरक्षेची काळजी घेत असतांना स्वच्छता ठेवण्याचे काम आषाणे येथे स्थानिक आणि वन विभाग घेत असल्याने वर्षासहल प्रेमींना खऱ्याअर्थाने चांगला प्रतिसाद मिळतांना दिसत आहे. त्यामुळेच धबाधबा कोसळणारा आषाणे धबधबा पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्र बिंदू ठरला आहे.

अत्यंत मनमोहक असलेला कर्जत तालुक्यातील धबधबा वदप गावानाजीक आहे. हा धबधबा पर्यटकांना खुणावत असतो. कुटुंबियांसह आनंद घेण्यासाठी या धबधब्या सारखा दुसरा कोणताही धबधबा नाही. मिनी माथेरान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ढाकच्या डोंगरातून हा धबधबा कोसळतो पांढरे स्वच्छ दुधासारखे पाणी जेव्हा कोसळते तेंव्हा वेगळाच अनुभव आपल्याला मिळतो. विशेष म्हणजे उन्हाळ्यातही या धबधब्याचा आनंद लुटता यावा म्हणून शासन प्रकल्प राबविण्याच्या विचारात आहे. कर्जत रेल्वे स्थानका पासून केवळ सहा कि.मी. अंतरावर हा धबधबा आहे. मोठ्या पुलावर आल्यावर शेअर रिक्षेने किंवा जांभिवली एसटी बसने वदप गावामध्ये जाता येते. तेथूनच या धबधब्याचे दर्शन घडते. पहाताच क्षणी तेथे जाण्यासाठी पावले पडतात व पंधरा वीस मिनिटातच धबधब्याचा आनंद आपण मनसोक्त घेऊ शकतो.सकाळी लवकर येथे गेल्यास फारशी गर्दीही नसते. दुपारनंतर मात्र गर्दी होण्याची सुरुवात होते. या ठिकाणी जाण्याच्या रस्त्यावर सुरुवातीलाच एक छोटे उपहार गृह आहे. धबधब्याकडे जातांनाच जेवण्याची ऑर्डर दिल्यास मनमुराद आनंद घेऊन घरच्या जेवणाचा आनंदही घेता येत होता.

मिनी माथेरान म्हणून प्रतीक्षेत असलेल्या ढाकच्या डोंगरावरून पडणारे पाणी उन्हाची किरणे पडल्यावर अधिकच मनमोहक दिसते. जेथे पहिले पाणी पडते तेथे जाण्याचे शक्यतो टाळावे, मात्र त्यापासून थोड्या अंतरावरून पाण्याचा आनंद घेतल्यास संपूर्ण वर्षाचा क्षीण गेल्याचा अनुभव येतो. अशा या नयनरम्य ठिकाणाला अवश्य भेट दिल्यास डोळ्यांचे पारणे फिटेल. धबधब्यांवर जाण्यास बंदी नसल्याने पर्यटकांनी यंदा आपला मोर्चा पुन्हा एकदा इकडे वळविला आहे.

तालुक्यातील सर्वांत सुरक्षित धबधबा असा नाव लौकिक असलेला धबधबा म्हणजे मोहिली गावा नजीकचा 'मोहिली धबधबा'. मोहिली धबधबा कर्जत तालुक्याच्या प्रसिद्ध अशा वासराच्या खोंड्यात आहे. कर्जत रेल्वे स्टेशनपासून कर्जत-कोंदिवडे रस्त्यावर अवघ्या चार किलोमीटर अंतरावरून उजव्या बाजूला मोहिली पुलावरून सुमारे एक ते दीड किलोमीटर अंतरावर हा धबधबा आहे. ज्यांना माहीत आहे तेच या धबधब्यावर येतात.

खंडाळा घाटातून येणाऱ्या पाण्यामुळे हा धबधबा भर भरून वाहत असतो. या धबधब्याचा परिसर अतिशय नयनरम्य परिसरात आहे. या धबधब्याचे विशेष म्हणजे लहान मुलांसाठी धबधब्याच्या खालच्या बाजूला एकदम मस्तपैकी सहा-सात मुले बसतील असे एखाद्या बायका सारखा दगड पसरला आहे. या दगडावर बसून मुले सुरक्षितपणे आनंद घेऊ शकतात. खरे तर पावसाळ्यात तालुक्यातील सर्वच धबधबे, धरणे व तलावांवर जाण्या साठी मनाई आहे. तरीही शनिवार, रविवार किंवा सुटीच्या दिवशी बहुतांश ठिकाणी पर्यटकांची गर्दी असते. विशेष म्हणजे या धबधब्याच्या परिसरात काचेच्या फोडलेल्या बाटल्या किंवा कोणत्याही प्रकारचा कचरा आढळून येत नाही. येथे येण्यासाठी सांडशी एसटी बसने मोहिली पुला नजीक उतरून चालत धबधब्यापर्यंत जाता येते. तसेच सहा आसनी व तीन आसनी रिक्षा मोहिली मिडॉस पर्यंत जाऊ शकतात. तेथून थोडे चालत धबधब्यापर्यंत जाता येते. हा धबधबा अनेकांना माहीत नाही, परंतु सर्वांत सुरक्षित व मोठे रुंद पात्र असलेला हा धबधबा आहे.

कर्जत तालुका म्हणजे पर्यटकांना पर्वणीच आहे. जगप्रसिद्ध माथेरान हे थंड हवेचे ठिकाण, कोंढाणे येथील लेणी, ढाक, पेठ अशी अनेक ठिकाणे मुंबईकरांचे लक्ष वेधून घेतात. या तालुक्यात अनेक फार्म हाऊस आणि रिसॉर्ट आहेत. त्यामुळे उन्हाळ्यातही येथे येण्यासाठी अनेक जण उत्सुक असतात. तसेच पावसाळ्यात या तालुक्यात अगदी कुठेही गेलात तरी धबधबे दिसतात. तसेच वरणे गावनजीकचा धबधबा, जांबरूग येथील धबधबा, माथेरान घाटातील धबधबा हे धबधबेंसुद्धा पर्यटकांना मोहित करतात. पळसदरी येथील धबधबा, पळसदरी तलाव, सोलनपाडा धरण ही सुद्धा पर्यटकांची वर्षा सहलीची आवडती ठिकाणे आहेत. यंदा तेथे जाण्यास बंदी नसल्याने वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांच्या झुंडीच्या झुंडी येताना दिसतात.

## बदलते तंत्रज्ञान

### सुपरफास्ट इंटरनेट स्पीडसाठी सेटिंग्जमध्ये करा 'हा' बदल



स्मार्टफोनमध्ये नेटवर्कची अडचण आली की चिडचिड वाढते, कारण अनेक कामे यामुळे अडकून पडतात. कार्यालयीन कामे करणाऱ्यांची चिडचिड तर विचारता सोय नाही. स्मार्टफोन हातात आहे, पण त्यात इंटरनेट चालत नसेल तर आपले काम अडते होते. कंपन्या दावा करतात ५जी नेटवर्कचा, पण प्रत्यक्षात अनेक ठिकाणी थ्रीजीचे नेटवर्कदेखील मिळत नाही. अथवा स्मार्टफोनमधील काही अडचणी त्यासाठी कारणीभूत ठरतात.

नेटवर्कच्या अडचणीचे सर्वात मोठे कारण कमकुवत सिग्नल आहे. जर तुम्ही अशा ठिकाणी आहात, जिथे सिग्नल कमकुवत आहे तर तुमचे इंटरनेट कासवापेक्षाही मंद होईल. त्यामुळे ती जागा बदलावा. इतर ठिकाणी नेट सर्च करा.

इंटरनेट ट्रॅफिक असेल, एखाद्या ठिकाणी अधिक वापरकर्ते असतील तर नेटवर्क जाम होते. इंटरनेट स्लो होते आणि कॉल पण मध्येच ड्रॉप होतो. अशावेळी वायफाय असेल तर त्याचा वापर करा. कमी डेटा वापरणाऱ्या ॲप्सचा वापर करा.

फोनचा सॉफ्टवेअर नेहमी अपडेट ठेवा. जुने सॉफ्टवेअर नेटवर्क जोडणीसाठी अडचणीचे ठरते. फोनच्या सेटिंग्जमध्ये जाऊन नियमीतपणे अपडेट करा.

खराब सिम कार्ड नेटवर्क अडचण आणते. सिम कार्ड काढून त्यातील गडबड शोधा. त्यात धुळ असेल तर ते स्वच्छ करा. तरीही नेटवर्कचा इश्यू येत असेल तर सिम कार्ड बदलवा. तरीही नेटवर्कचा इश्यू येत असेल तर सिम कार्ड बदलवा. कॉडलेस फोन अथवा इतर वायरलेस नेटवर्क तुमच्या जवळपास असतील तर तुमच्या मोबाईलचे सिग्नल कमकुवत करु शकतात. त्यामुळे योग्य जागा शोधा. तिथे कदाचित नेट वेगाने धावेल.

सध्या काही प्रमुख कंपन्यांनी मोबाईल रिर्चाजचे दर वाढवले आहेत. त्यामुळे ग्राहकांना पूर्वीच्या तुलनेत अतिरिक्त पैसे मोजावे लागत आहेत. ते लक्षात घेता इंटरनेट स्पीड व्यवस्थित मिळावा यासाठी कंपन्यांनीही उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# मराठ्यांचा इतिहास लिहिणारा ग्रँट डफ



**निमित्त**

मराठ्यांच्या इतिहासावर लिहिणारा सुप्रसिद्ध इतिहासकार कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ. त्याचा जन्म ८ जुलै १७८९ रोजी बॅम्फ (स्कॉटलंड) येथे झाला. प्राथमिक शिक्षणानंतर त्याने अबर्डीन येथील मार्शल महाविद्यालयात प्रवेश घेतला, पण शिक्षण अपुरे टाकून तो सोळाव्या वर्षी ईस्ट इंडिया कंपनीत मुंबईच्या लष्करात नोकरीला आला.

१८०६ साली बॉम्बे नेटिव्ह इन्फट्री अथवा बॉम्बे ग्रेनेडिअर्समध्ये त्याला अधिकाराची जागा मिळाली. एल्फिन्स्टनने त्यास मुद्दाम पुण्यास बोलावून घेतले. १८१७च्या खडकी येथील मराठ्यांबरोबरच्या युद्धात त्याने प्रसंगावधान दाखवून शौर्य दाखविले. या सुमारास त्याचा एल्फिन्स्टनशी चांगला परिचय झाला आणि त्यास कॅप्टन हा किताब मिळाला. १८१८मध्ये त्याची एल्फिन्स्टनने साताऱ्यास पोलिटिकल एजंट म्हणून नियुक्ती केली. तो साताऱ्यास १८१८ ते १८२२ अशी चार वर्षे राहिला आणि साताऱ्याची राजकीय व्यवस्था लावून प्रतापसिंहास सुशिक्षित केले.

१८२३च्या जानेवारीत तो मायदेशी रजा घेऊन गेला, तो पुन्हा हिंदुस्तानात परत आला नाही. १८२५मध्ये त्याने कंपनीच्या नोकरीचा राजीनामा दिला. तत्पूर्वी त्याची आई वारली. १८२५मध्ये जेन कॅथरिन या तरुणीशी त्याने विवाह केला. तिची काही संपत्ती त्यास मिळाली. म्हणून उर्वरित आयुष्य त्याने आपली संपत्ती व शेती यांची देखभाल करण्यात घालविण्याचे ठरविले.

एल्फिन्स्टनच्या आज्ञेप्रमाणे त्याने ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध घेऊन १९ जुलै १८१९ रोजी मराठ्यांचा सुसंगत इतिहास लिहिण्याचे कार्य अंगीकारले. थोड्याच अवधीत एल्फिन्स्टनच्या अनुमतीने त्याने लेखनकार्यास आरंभ केला. सातारचे महाराज तसेच अनेक संबंधित सरदार, सरदेशमुख, देशपांडे आणि आदिलशाही, निजामशाही येथील तवारिखा व मराठी बखरी तसेच पत्रे जमवून माहिती गोळा केली. यामध्ये त्यास बाळाजीपंत नातू यांचे फार सहाय्य झाले. हा सर्व इतिहास त्याने एल्फिन्स्टन, ब्रिग्झ, व्हॅन्स केनेडी, विल्यम अर्स्किन, बाळाजीपंत नातू यांना दाखविला व मसुदा तयार केला (१८२२).

जॉन मरे पब्लिशर्स लि. कंपनीने या पुस्तकाचे 'मोगल सत्तेचा ऱ्हास आणि ब्रिटीश सत्तेचा उदय' असे नामकरण केल्यास छापू म्हणून कळविले. तेव्हा मला मराठ्यांचाच इतिहास केवळ सांगावयाचा आहे, असे बाणेदार उत्तर देऊन त्याने स्वखर्चाने लॉंगमन्स लि. कंपनीकडून १८२६मध्ये हिस्टरी ऑफ द मराठाज हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. या व्यवहारात त्यास त्या वेळी दोन हजार पौंड खर्च आला. त्यापैकी तीनशे पौंड कसेबसे वसूल झाले. १९२१पर्यंत या ग्रंथाच्या सहा आवृत्या निघाल्या.

१८२९मध्ये कॅ. डेव्हिड केपेन व बाबा साने यांनी या ग्रंथाचे मराठ्यांची बखर या शीर्षकाने मराठीत भाषांतर केले. त्याच्याही सहा आवृत्या निघाल्या. त्याच्या ग्रंथावर प्रथम कुठेच समीक्षण आले नाही व टीकाही झाली नाही, मात्र नंतरच्या मराठी इतिहासकारांनी त्याच्या हिस्टरी ऑफ द मराठाज या ग्रंथावर सडेतोड टीका केली. तथापि, मराठ्यांचा सुसंगत इतिहास लिहिण्याचा त्याचा प्रयत्न सर्वांनी मान्य केला.

एडन येथे स्थायिक झाल्यावरही त्याचा प्रतापसिंह व एल्फिन्स्टन यांच्याशी प्रदीर्घ काळ पत्रव्यवहार चालू होता. सातारच्या राजाची पदच्युती आणि राज्य खालसा (१८४८) या संबंधीची ब्रिटिश नीती त्याला आवडली नाही. त्यास दोन मुलगे आणि एक मुलगी होती. त्याचा एक मुलगा माउंट स्ट्यूअर्ट एल्फिन्स्टन ग्रँट डफ हा पुढे मद्रासचा गव्हर्नर झाला. तो एडन येथे २३ सप्टेंबर १८५८ रोजी मरण पावला. **-अ. रा. कुलकर्णी**

## आरोग्य प्रहर

### स्ट्रॉबेरीच्या पानांचाही होतो शरीराला फायदा

सर्वसाधारणपणे १०० रुपयांचा वाटा अशी मिळणारी लाल, रसाळ स्ट्रॉबेरी सगळ्यात आधी डोळ्याला भावते. स्ट्रॉबेरीचे असंख्य फायदे हे सर्वमान्य आहेत, फक्त स्ट्रॉबेरीच नव्हे; तर त्याची पानसुद्धा आरोग्यासाठी खूपच गुणकारी ठरू शकतात. स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये पॉलिफेनॉल हे अँटिऑक्सिडंट व व्हिटॅमिन सी असते. याव्यतिरिक्त ते इतर पोषक तत्वांनी भरलेले असतात जे आपल्या शरीरासाठी फायदेशीर असतात. स्ट्रॉबेरीच्या पानांचे काही फायदे खालीलप्रमाणे...



व्हिटॅमिन आणि मिनरल बूस्ट: स्ट्रॉबेरीची पाने व्हिटॅमिन सीचा एक उत्तम स्रोत आहेत, जी रोगप्रतिकारक शक्तीसाठी आवश्यक आहे. याशिवाय स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये जीवनसत्त्वे ए, के, लोह आणि कॅल्शियम सारखी खनिजे देखील असतात.

अँटिऑक्सिडंटचा पॉवरहाऊस: स्ट्रॉबेरीच्या पानांमध्ये फ्लेव्होनॉइड्ससारखे अँटिऑक्सिडंट्ससुद्धा मुबलक प्रमाणात असतात. हे अँटिऑक्सिडंट्स मुक्त रॅडिकल्सचा सामना करण्यास मदत करतात आणि आजारांचा धोका कमी करू शकतात.

रक्तातील साखरेचे नियमन : काही अभ्यासात असे दिसून आले आहे की, स्ट्रॉबेरीची पाने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करू शकतात.

पचनाला सहाय्य : स्ट्रॉबेरीचे पाने आहारात फायबर जोडतात, ज्यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारू शकते. तसेच पोट स्वच्छ होण्यासही हातभार लागू शकतो.

स्ट्रॉबेरीच्या बऱ्याच जातींची पाने खाण्यायोग्य असतात, परंतु वापरासाठी एकही 'सर्वोत्तम' प्रकार नाही. पानांवरील कीटकनाशकांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी सेंद्रिय, ताज्या स्ट्रॉबेरीची निवड करा.

फळांच्या तुलनेत स्ट्रॉबेरीच्या पानांची चव वेगळी असते. मल्होत्रा पुढे सांगतात, त्यात किंचित तुरट, गोड, चव असते तर पोत पालकापेक्षा पातळ असू शकतो. त्याचा वापर स्वयंपाकात कसा करता येईल हे पाहूया..

सॅलड्स : स्ट्रॉबेरीची बारीक चिरलेली पाने सॅलडमध्ये उत्तम चवीची जोड करू शकतात.

चहा आणि पेये : स्ट्रॉबेरीची पाने हर्बल चहासाठी उत्तम ठरतात.

## क्लिक...क्लिक...!



**म्हसळा : पावसामुळे कोकणात शेतीकामे सुरू असून खरसई येथे टिपलेले हे शिवारातील छायाचित्र.** (छाया : अमेय नाझरे)

## निवडक

### हिरवळ महाविद्यालयत स्वागत समारंभ




**माणगाव** : हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ नुकताच घेण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या विविध विभागांच्या कामकाजाबद्दल तसेच उपक्रमांबद्दल माहिती देण्यात आली. सिनियर कॉलेजचे प्राचार्य सुदेश कदम यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले, तसेच रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य राकेश वडवळकर यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार बदलेल्या अभ्यासक्रम व परीक्षा पद्धतीविषयी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया व महाविद्यालयाच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**माथेरान** : स्व. मिनाक्षी तमीळ आमुधन यांच्या स्मरणार्थ रविवारी (दि.७) नगर परिषदेच्या प्राथमिक शाळेत येथील गव्हाणकर एज्युकेशन ट्रस्ट, सेंट झेव्हियर स्कूल आणि वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेतील सर्व शालेय विद्यार्थ्यांना मिशन माथेरान सोशल ग्रुपच्या सौजन्याने शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले, तर काही गरजवंत स्टॉल्सधारकांना मोठ्या छत्र्या देण्यात आल्या. या वेळी भाजप अध्यक्ष प्रवीण सकपाळ, क्षत्रिय मराठा समाज अध्यक्ष चंद्रकांत जाधव, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, राजेश चौधरी, संदीप कदम, किरण चौधरी, राकेश चौधरी, शैलेश चाफेकर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, प्रकाश सुतार, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, नितीन शहा, गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे उपस्थित होते.

### रोह्यातील सोसायटीत वृक्षारोपण

**धाटाव :** रोहा तालुक्यातील भुवनेश्वरमधील अंकित फिओना सोसायटीत वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी बहावा, गुलमोहर, सोनमोहर, बकुळ, सप्तपर्णी व निंब आदी झाडांची लागवड करून सोसायटी सदस्यांनी या झाडांचे संगोपन करण्याचा निर्धार करण्यात आला. या वेळी सोसायटी अध्यक्ष विजय गोतमारे, सचिव रवींद्र कान्हेकर, खजिनदार अमित खंडागळे, सहसचिव शिवाजी पाटील, सदस्य नितीन सानप, चेतन ओमले, हरेश कडू, श्रेया मोरे, संपदा महाडिक, सचिन मोरे, अनिष गुरव आदी उपस्थित होते.



## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. शनिवारी (दि.६) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २९२ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ८७ हजार ९०० रुपये इतका दंड आकारला आहे.

# मोरझोत धबधबा पोलादपूरच्या वर्षापर्यटनाचा मानबिंदू

## ◆ वर्षासहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांची गर्दी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील उमरठ मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या रस्त्यावरून नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाचे सुशोभीकरण व तेथून पुढे रामाचे कुडपण येथील नरवीरांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे सुशोभीकरण पाहून झाल्यानंतर थेट चांदके ते खोपड रस्त्यालगत मोरझोत धबधबा पोलादपूर तालुक्याचा मानबिंदू ठरत आहे.

वरंध घाटामधून रामदास पठाराच्या सुंदरमठासमोर दिसणारा मोरझोत धबधबा उमरठपासून दीड किमी अंतरावर चांदके ते खोपडदरम्यान आहे.

मोरझोत धबधबा हा खोपड ते चांदके रस्त्यालगतच असल्याने सुगम आहे, परंतु, तेथे जाण्यासाठी अलिकडेच पंतप्रधान ग्रामसडक योजनेचा रस्ता जीर्ण होऊ लागल्याने तसेच उमरठपर्यंतचा रस्ता पक्का नसल्याने वर्षासहलींमधून येणाऱ्या तसेच दुचाकीस्वार पर्यटकांना काहीसा नाराज करणारा अनुभव घ्यावा लागतो, मात्र थ्रील अनुभवण्यासाठी मुंबई, महाड, पुणे, खेड आणि अन्य भागांतील तरूण-तरूणी येथे आठवड्याच्या शेवटी आवर्जून येत असतात.


या धबधब्यावर वर्षासहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे येथे मक्याची कणसे, कोंबडी-वड्यांची सागुती, चणे, शेंगदाणे, पॉपकॉर्न आणि स्नॅक्स तसेच गरमागरम चहाच्या गिऱ्हाईकांकडून स्थानिकांना दिवसागणिक चांगली कमाई होत असते. विकएन्डसह आठवड्याच्या अन्यदिवशी येणारे वर्षापर्यटक निखळ आनंद घेण्यास मित्रमैत्रिणींचा ग्रुप अथवा सहकुटूंब येऊन मोरझोत धबधब्याखाली उभे राहून स्नान करतात.

२०२१मध्ये या मोरझोत धबधब्याजवळ दरडी कोसळल्यामुळे गेल्या दोन वर्षांमध्ये पर्यटकांनी सावधपणे धबधब्याचा आनंद घेतला, मात्र आता परिसरातील दरडी पूर्णपणे हटविण्यात आल्याने धबधब्याचे पात्र पुर्वीप्रमाणे शुभ्रधारेने कोसळून सप्तरंगी जलतुषारांची बरसात करीत आहे.



# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे वृक्षलागवड

## मुरूडमध्ये ८३ श्रीसदस्यांकडून संवर्धनाचे काम



**मुरूड : रामप्रहर वृत्त**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनखाली रविवारी (दि.७) मुरूड परिसरातील ८३ श्रीसदस्यांनी ग्रामीण रुग्णालय, तहसीलदार कार्यालय, समुद्रकिनारी, राजपुरी व डोंगरी परिसरातील लावलेल्या झाडांना कुंपण केले. परिसरातील गवत काढून कचरा गोळा केला आणि रिकाम्या जागेत नवीन झाडे लावली. यामुळे परिसरात हिरवळ दिसू लागली आहे.

पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्रीसदस्य पावसाळ्यात वृक्षलागवड करतात व त्याची निगा राखतात. एवढेच नाही तर दर शुक्रवारी या झाडांना पाणी देण्याचे काम करतात. मुरूडच्या सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्याकडे जाणारा रस्त्यावर नानासाहेब प्रतिष्ठानतर्फे झाड लावून जागविण्यात आल्याने येणाऱ्या पर्यटकांना ही झाडे आनंद देतात.

# रोह्यातील भुवनेश्वर ते निवीदरम्यान रस्त्यावर पाणी; वाहतुकीस अडथळा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा ते किल्ला या रस्त्यालगत कालवा आहे. उन्हाळ्यात या कालव्याची साफसफाई करण्यात आली, परंतु ड्रेनेज मोकळे न केल्याने कालवा भरल्यानंतर भुवनेश्वर ते निवीदरम्यान दोन ठिकाणी कालव्यातील पाणी रस्त्यावर येत आहे. हे पाणी रस्त्यावर येत असल्याने वाहनचालकांना ये-जा करताना वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. रात्रीच्या वेळी कालव्यात पडण्याची भीती पाण्यामुळे निर्माण झाली आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाने यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.



निवी तळाघर, लांडर, बोरघर, वाशी ते किल्ला या गावाकडे जाण्यासाठी रोहा ते किल्ला हा रस्ता खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातून बनवण्यात आला. त्यामुळे या रस्त्यातून चांगली वाहतूक सातत्याने होत आहे. रहदारीसाठी या गावातील लोकांना सोयीस्कर ठरत आहे. या रस्त्यालगत कालवा आहे, परंतु या कालव्याकडे पाटबंधारे विभागाचे सातत्याने दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आल्याचे दिसून येते.

शनिवारी रात्री जोरदार पाऊस पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी कालव्यातून वाहत होते. हे पाणी ठिकठिकाणी बाहेर पडण्यासाठी कालव्याला ड्रेनेज आहेत, परंतु हे ड्रेनेज साफ न केल्यामुळे ते पाणी रस्त्यावर येत आहे. रस्त्यावर पाणी आल्यामुळे कालवा व रस्ता दिसत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. रात्रीच्या वेळी या पाण्यामुळे कालव्यात पडण्याची भीती निर्माण झाली आहे. या रस्त्यावरून धाटाव परिसरातील गावात नागरिकांचा ये जा सातत्याने असतात. त्यामुळे या गोष्टीची दखल घेत पाटबंधारे विभागाने यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. कालव्यातील पाणी रस्त्यावर येऊ नये यासाठी ठिकठिकाणी ड्रेनेज असलेले भाग मोकळे करण्याची आवश्यकता आहे.

# माणगावात पाककला स्पर्धा उत्साहात

## ■ विजेत्यांचा ना.अदिती तटकरे यांच्या हस्ते गौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व विधान परिषदेचे माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीतर्फे महिलांसाठी तालुकास्तरीय पाककला स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि. ६) करण्यात आले होते. पाककला स्पर्धेत ६५ महिलांनी सहभाग घेतला. यातून श्रुती सुमित रेके प्रथम, स्वाती सतीश श्रीवर्धनकर द्वितीय, शुभांगी चंद्रकांत येलवे तृतीय क्रमांक पटकावला तर प्रिया शंकर उभारे व मल्लिकाबानू पठाण या महिला उत्तेजनार्थ बक्षिसांच्या मानकरी ठरल्या.



या स्पर्धेत मंथन स्पर्धा व एमएससीआयटी कोर्स पूर्ण केलेल्या राजिप विकास कॉलनी शाळेचा विद्यार्थी महेश अनिल पाटील याचा ना. अदिती तटकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्पर्धेला माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, माजी उपनगराध्यक्ष दिलीप जाधव, माणगाव शहर राष्ट्रवादी अध्यक्ष नितीन वाढवळ, भाजपचे शहराध्यक्ष नितीन दसवते, माजी नगरसेवक जयंत बोडेरे, विठोबा पालकर, राकेश पवार आदींनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे परीक्षक म्हणून रोहित गांधी व कोमल मेथा यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महिला तालुकाध्यक्ष संगीता बक्कम, शहराध्यक्ष योगिता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष शुभांगी जाधव, सोशल मीडिया प्रमुख किशोरी हिरवे, नगरसेविका सुविधा खैरे, हर्षदा काळे, हर्षदा काळे, रश्मी मुंढे, ममता थोरे, माजी नगरसेविका भाग्यश्री यादव, माधुरी मोरे, शुभांगी जाधव, मनाली पवार, देविका पाबेकर, विशाखा यादव, मनीषा खडतर, ऋतिका गायकवाड, प्राजक्ता जाधव, प्रणिता भोणकर, प्रियांका धुमाळ, तुळसा पवार,दीक्षिता जाधव, अपूर्वा बोडेरे व सहकारी महिलांनी परिश्रम घेतले.

# पोशीर गावाचे प्रवीण शिंगटे यांचा शिवसेनेत प्रवेश



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील पोशीर गावातील सामाजिक कार्यकर्ते प्रवीण शिंगटे यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. त्यांचे आमदार महेंद्र थोरवे यांनी पक्षात स्वागत केले.

प्रवीण शिंगटे हे नेरळ आणि पोशीर भागातील सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. या वेळी शिवसेना जिल्हा सल्लागार संतोष भोईर, युवा सेना कॉलेज कक्षाचे वैभव मोहिते यांच्यासह तैसिफ नाचन, प्रवीण तुपे, अभिजीत गोमारे, निरीक्षक प्रशांत पाटील, अक्षय शिंगटे उपस्थित होते. शिंगटे यांच्यापाठीशी तरुण कार्यकर्त्यांचे मोठे पाठबळ आहे. त्यामुळे प्रवीण शिंगटे यांच्यामुळे शिवसेना या भागात आणखी सक्षम होण्यासाठी मदत होईल, असा विश्वास आमदार महेंद्र थोरवे यांनी व्यक्त केला.

# भाजप कामगार मोर्चा कोकण विभाग उपाध्यक्षपदी अरुण घोडके

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सामाजिक शैक्षणिक, आरोग्य, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणारे कामगार नेते अरुण राजाराम घोडके चौक खालापूर यांचे असलेले काम पाहून त्यांची भाजप कामगार मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कोकण विभाग उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

यासंबंधी नियुक्तीपत्र महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खांडे यांनी भाजप कार्यालय मुंबई येथे देण्यात आले. या वेळी भाजप कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अरुण घोडके यांचे अभिनंदन भाजप महाराष्ट्र प्रदेश महामंत्री कामगार नेते संजय केणेकर, माधवी नाईक, कामगार मोर्चा प्रदेश प्रभारी गणेश ताठे, कामगार मोर्चा प्रदेशाध्यक्ष ॲड. विजय हरगुडे, संघटन सरचिटणीस हनुमंत लांडगे, प्रदेश सचिव ॲड. भूषण पाटील,



उपाध्यक्ष मंगेश चव्हाण, चित्रपट कामगाराध्यक्ष समीर दीक्षित, उपाध्यक्ष प्रसिद्धी अभिनेत्री किशोरी शहाणे, भाजप मुख्य प्रवक्ता अजय चव्हाण, तसेच रायगड जिल्हा कामगार मोर्चा अध्यक्ष जितेंद्र घरत, सरचिटणीस ज्ञानेश्वर साखरे, सचिव जगदीश म्हात्रे, वामन धुळे, दीपक हातनोलकर, दत्तात्रेय पाटील, पियुष ठाकूर यांनी कार्यक्रमस्थळी अभिनंदन केले.

भाजपचे आघाडीचे कार्यकर्ते म्हणून खालापूर तालुक्यांमध्ये प्रसिद्ध असलेले अरुण घोडके यांच्या नियुक्तीबद्दल चौक परिसरातील अनेक सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## पांडुरंग भातोसे सेवानिवृत्त

**चौक :** शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातून पांडुरंग सोनू भातोसे हे प्रदीर्घ सेवेतून नियतनियमानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा निरोप समारंभ बांधकाम विभागाने केला.

पांडुरंग भातोसे यांनी ४१ वर्षे सेवा केली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वेगवेगळ्या खात्यात त्यांनी काम केले सेवानिवृत्तीपूर्वी ते नाईक पदावर असताना अनेकांना कामाची पद्धत, वरिष्ठांचा आदर, कामगार हितासाठी प्रयत्न या बाबत मार्गदर्शन केले. त्यामुळे ते सतत वरिष्ठांच्या मर्जित राहिले. त्यांची सेवा, त्यांचे वागणे इतरांना देणारा सन्मान, आणि त्यांची कार्यशैली चांगली होती, असे अधिक्षक अभियंता सु. ल. टोपले यांनी सांगितले, तर सर्वांची जबाबदारी व काळजी घेणारे कर्मचारी दुर्मिळ असतात, त्यांची उणीव सतत भासेल असे लक्ष्मन जाधव यांनी सांगितले. गुण दक्षता आणि गुणनियंत्रण मंडळाचे कार्यकारी अभियंता प्रतिभा कुंभार, उपअभियंता सुरेश मोरे, लक्ष्मण जाधव यांच्यासह ठाणे परिमंडळातील अनेकजण उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे विहीघर, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार निर्मला बाळाराम फडके व अमृता विनोद पाटील राहणार: विहीघर, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून आमचे अशिलानी योग्य त्या परवानग्या घेवुन कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे विहीघर, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | |
| १६१ | १ | ०-२६-४० | ०-००-२० | ०-२६-६० | ५.३१ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार,फरोक्त,पोटगी,वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विघमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०७/०७/२०२४

**कार्यालयीन पत्ता**
बी.१०२,पहिला मजला,श्री दत्तराज सोसायटी,जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**सही /-**
**ॲड.स्वप्निल व्यं जाधव**
बी.ए,एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकिल)

## निवडक



### आईच्या नावावर एक झाड उपक्रम

**नवी मुंबई :** आपल्या आईच्या स्मृती जपण्यासाठी, आदर देण्यासाठी 'एक झाड आईच्या नावावर' या उपक्रमाचे आयोजन केले होते. उपक्रमांतर्गत शनिवारी (दि. ६) वाशी येथील सेक्टर-३० मध्ये श्री माँ फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेळी श्री मा फाउंडेशनच्या अध्यक्षा अंजूला राय, भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष राजेश राय, निसर्गप्रेमी तानाजी फणसे, ज्येष्ठ नागरिक संघ सानपाडा अध्यक्ष मारुती कदम, अश्विन राय, कांता जाधव, मनोजकुमार झा, चैतन्य झा, अरुण कुमार, सुहास माने आदी उपस्थित होते.

### वृक्षारोपण व प्लास्टिक जनजागृती



**मोहोपाडा :** कृषी सप्ताहानिमित्त प्रसोल केमिकल्स होनाड आणि रसायनी पाताळगंगा नदी व पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच शिवछत्रपती विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील परिसरात विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच प्लास्टिक बंदी म्हणून कापडी वाटप करून नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. या वेळी अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, भास्कर लांडगे शाळा कमिटी अध्यक्ष, मुख्याध्यापक जाधव सर, निलेश जाधव, पगारे मॅडम, आव्हाड मॅडम, सोनवणे सर, देव मुंढे सर, विर सर आदी शिक्षक उपस्थित होते.

### हनुमान गड येथे वृक्षारोपण

**नवी मुंबई :** महाराष्ट्र भूषण डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने नवी मुंबई येथील महापे एमआयडीसी येथील श्री हनुमान गड येथे ठाणे वनविभागाच्या जागेत वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन उपक्रम हाती घेण्यात आला होता. २५० वृक्ष लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. यावेळी ठाणे वनपरिक्षेत्र अधिकारी ठाकरे यांच्यासह माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी नगरसेवक शिवराम पाटील, माजी नगरसेवक चंद्रकांत पाटील, सामाजिक कार्यकर्ते नामदेव डाऊरकर आदी उपस्थित होते.



# हेल्मेट न घालणाऱ्या १०० जणांवर कारवाई

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे येथील वरणा चौक परिसरात हेल्मेट न घालणाऱ्या १०० जणांवर कारवाई करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त तिरूपती काकडे यांच्या आदेशाने विशेष मोहिमेंतर्गत ही कारवाई करण्यात आल्याची माहिती एपीएमसी वाहतूक पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी दिली. या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांसह वाहनचालकांचेही वाहतुकीच्या नियमांविषयी प्रबोधन करण्यात आले.



या विशेष मोहिमेअंतर्गत सानपाडा रेल्वे स्टेशन आणि मुंबई पुणे हायवेकडून एपीएमसीकडे येणाऱ्या दिशेने सकाळच्या वेळी पुष्कळ वर्दळ असते. या वेळेत वाहनांची आणि पादचार्यांची गर्दीही असते. वाहन चालकांनी वाहतुकीचे नियम पाळावे आणि पादचाऱ्याचाही सुरक्षित प्रवास व्हावा, या उद्देशाने वारणा चौक परिसरात ही विशेष मोहीम घेण्यात आली.

या मोहिमेमध्ये पोलीस निरीक्षक यांच्यासह अन्य ४ कर्मचारीयांचे विशेष पथक कार्यरत होते. या वेळी दुचाकी वरून ट्रिपलशीट प्रवास करणाऱ्या ४ जणांवर कारवाईही करण्यात आली. तसेच दक्षिणमुखी हनुमान मंदिर चौक ते आय सी एल शाळा या अपघात प्रणव क्षेत्रात विशेष मोहीम राबून २१ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. तसेच अनेक वाहनचालकांचे वाहतूक नियमांविषयी प्रबोधन करण्यात आले. सर्वांनी हेल्मेट घालूनच दुचाकी चालवावी, असे आवाहन बिडवे यांनी केले आहे.

सेक्टर २६ येथील नवी मुंबई विद्यालयात आरएसपी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांचे वाहतूक नियमांविषयी प्रबोधन करण्यात आले. या वेळी पोलीस निरीक्षक विमल बिडवे आणि पोलीस उपनिरीक्षक बळीराम घंटे यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी १०० हून अधिक विद्यार्थी, पालक आणि शिक्षक उपस्थित होते.

# कळंबोली वाहतूक शाखेतर्फे रायडर्सना प्रशिक्षण, प्रबोधन

**पनवेल : वार्ताहर**

सध्याचे काळात मागील काही दिवसांत तरुण मुलांकडून त्यांचे कडे असलेल्या दुचाकी रायडर वाहनाद्वारे भरधाव वेगाने वाहन चालवल्यामुळे त्यावर नियंत्रण न राहिल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत. रायडर चालकांना प्रशिक्षण देणे तसेच त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक होते.

त्या अनुषंगाने कळंबोली वाहतूक शाखेच्या हद्दीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि, साठे व पथक यांनी रायडिंग करणारे दुचाकी वाहन चालक यांची मॅकडॉनल्ड्स कळंबोली या ठिकाणी चौकसभा घेऊन अतिवेगाने वाहन चालवलेल्या मुळे होणारे दुष्परिणाम तसेच अपघात याबाबत माहिती दिली तसेच दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट परिधान करणे मोबाईलवर न बोलणे दारू पिऊन वाहन चालवणे अतिवेगाने वाहन चालवणे व वाहतूक नियमाचे पालन करण्याबाबत सर्वांना समक्ष समज देण्यात आली.

अपघात कसे कमी करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनीदेखील वाहतूक विभागाकडून सांगितलेल्या सूचनांचे गांभीर्याने पालन करू, असे वचन दिले आहे.



# 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत विविध उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' हे विशेष अभियान राबविण्यात येत असून यामध्ये आरोग्याचा आणि स्वच्छतेचा परस्पर संबंध लक्षात घेत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानांतर्गत लोकसहभागावर भर देत सर्वच विभागांमध्ये स्वच्छता मोहीमा, जनजागृती तसेच कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे.



अतिरिक्त आयुक्त सुनील पवार आणि घनकचरा व्यवस्थापनाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली दोन्ही परिमंडळांचे उपायुक्त सोमनाथ पोटरे व डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली हे उपक्रम राबविले जात आहे. बेलापूर विभागात करावेगाव ते सिवूड नेक्सस मॉलपर्यंत काढण्यात आलेल्या भव्यतम स्वच्छता दिंडी प्रमाणेच विविध समाज घटकांना व विशेषत्वाने शहराचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागी करून वॉर्ड पातळीवरही अनेक उपक्रम राबविले जात आहेत.

अशाच प्रकारचा एक अभिनव स्वच्छता उपक्रम दिघा शाळा क्र. १०८ येथील विद्यार्थ्यांसह परिमंडळ २ चे उपआयुक्त तथा दिघा विभाग अधिकारी डॉ. कैलास गायकवाड यांच्या माध्यमातून स्वच्छता अधिकारी विजय पडघन व विभागातील अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतामित्र यांनी राबविला. या वेळी परिसर स्वच्छता करण्यात आली तसेच स्वच्छता, प्लास्टिक प्रतिबंध व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरण संरक्षण, संवर्धनाची शपथ घेण्यात आली.

ऐरोली विभागातही नमुंमपा शाळा क्र. ५३ चिंचपाडा येथे 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले व त्यांना आपल्या घरापासूनच कचरा व्यवस्थापनाची सुरूवात करण्याचे सांगण्यात आले. शाळेच्या बाजूलाच असलेल्या प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रातही 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानाचे महत्व सांगण्यात आले. यामध्ये नागरिकांशी थेट संपर्क असणाऱ्या आशा वर्करची जनजागृतीमधील महत्त्वाची भूमिका त्यांना पटवून देण्यात आली तसेच मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी संपूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात आले.

ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी अशोक अहिरे तसेच उप मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांनी आपले विभागातील सहकारी, स्वच्छतामित्र तसेच शाळेचे मुख्याध्यापक – शिक्षक आणि नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सुषमा सरकुटे, आशा वर्कर, मलेरिया फवारणी कामगार यांच्या सहयोगाने हा उपक्रम यशस्वीरित्या राबविला.

### नवी मुंबई परिसरात पावसाचे आगमन

**नवी मुंबई :** बऱ्याच दिवसांपासून गायब झालेल्या पावसाने शनिवारी व रविवारी जोरदार आगमन केले. शहर परिसरात अनेक ठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. दुपारनंतर पावसाने विश्रांती घेतली होती.

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्राभिमानी, विचारवंत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना जयंतीनिमित्त नवी मुंबई जिल्हा भाजपतर्फे शनिवारी अभिवादन करण्यात आले.

बोनकोडे येथील भाजपा कार्यालयामध्ये आमदार गणेश नाईक, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक यांनी तर वाशी येथील भाजप कार्यालयात नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे प्रतिमा पूजन केले. 'एक पेड मा के नाम' या उपक्रमांतर्गत जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या हस्ते वृक्षारोपणदेखील करण्यात आले.



डॉक्टर मुखर्जी यांच्या स्वप्नातील एकसंघ आणि बलशाली भारत घडविण्यासाठी आपण सर्व त्यांच्या जयंतीदिनी कटिबद्ध होऊया, असे विचार या मान्यवरांनी व्यक्त केले. लावलेली वृक्षरोपे नियोजनबद्धरित्या जगविण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष नाईक यांनी केले.

# भात लागवडीची पाहणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कसळखंड गावचे प्रगतशील शेतकरी कमलाकर धोंडू घरत यांनी सन २०२१ला कमी खर्चात जास्त उत्पादन देणारी भात लागवड शोधून काढली.

या लागवडीला एक एकर शेती जमीनीला बियाणे सात किलो तसेच लागवडीला एक एकरला फक्त नऊ मजुर लागतात. कारण भाताची ४ते५रोपे घेऊन एक फुट बाय एक फुट सरळ रेषेत केली तर रोपांना २५ ते२७ फुटवे येतात.

ती लागवड पाहण्यासाठी ग्रुप ग्रामपंचायत कसळखंडचे सरपंच संजय घरत तसेच ग्रामसेवक लवटे साहेब आणि ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी वर्ग यांनी कृषी सम्राट कमलाकर घरत प्रगतशील शेतकरी यांच्या शेतावर जाऊन पाहणी केली.





**पनवेल : माजी जिल्हा परिषद सदस्य तथा तालुका उपाध्यक्ष राजेंद्र पाटील यांचा वाढदिवस अभीष्टचिंतन सोहळा शनिवारी मानघर येथील छाया रिसॉर्ट येथे मोठ्या उत्साहात झाला. या वेळी अलिबाग तालुक्याचे आमदार महेंद्र दळवी, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष प्रकाश खैरे, रायगड जिल्हा भाजप युवा मोर्चाचे सरचिटणीस दिनेश खानावकर, ॲड. पवन भोईर, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, शिवसेना तालुका अध्यक्ष रुपेश ठोंबरे, सुकापुर ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, राजेश पाटील, विचुंबे ग्रामपंचायत सरपंच प्रमोद भिंगारकर आदी उपस्थित होते.**

# फुंडे हायस्कूलमध्ये वीर वाजेकर यांना अभिवादन



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे, तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे शनिवारी (दि. ६) महालण विभागाचे शिक्षण महर्षी आणि फुंडे हायस्कूलचे संस्थापक तुकाराम हरी वाजेकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

विद्यालयाच्या स्थानिक स्कुल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, विद्यालायचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे आणि सर्व सेवक वृंद यांच्या हस्ते तुकाराम हरी वाजेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दीपक ठाकूर यांनीही वाजेकरांच्या प्रतिमेस अभिवादन केले. ज्येष्ठ विज्ञान शिक्षक एस. डी. म्हात्रे यांनी वीर वाजेकरांच्या अगदी जन्मापासून ते त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्यापर्यंतचा वारसा विद्यार्थ्यांना सांगितला.

सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील यांनीदेखील वाजेकरांच्या कार्याची माहिती आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना सांगितली.

# गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप

**नवी मुंबई :** बेलापूर प्रभाग क्रमांक १०६ येथे विजय नाहटा फाउंडेशनच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शिवसेना उपनेते तथा विजय नाहटा फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष विजय नाहटा यांच्या हस्ते मोफत वह्या वाटप करण्यात आले.

दहावी व बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. या वेळी नाहटा म्हणाले की शिक्षण सशक्त समाज घडविण्यासाठी महत्वाचे आहे. त्यामुळे शिक्षण घ्या, तेच तुम्हाला प्रतिष्ठा मिळवून देईल. या वेळी प्रमुख पाहूणे म्हणून उपजिल्हाप्रमुख मिलिंद सुर्यराव, दिलीप घोडेकर, शहर प्रमुख विजय माने आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन बेलापूर विधानसभा युवती सेना शहरप्रमुख लिना म्हात्रे, उपशहरप्रमुख निलकंठ म्हात्रे, सहसंपर्कप्रमुख विशाल कोळी, महीला उपजिल्हाप्रमुख तेजस्वीनी कोळी, सविता पाटील उपशहरसंघटक, उपशहरप्रमुख रामा कोळी, डॉ. भुषण भोरे व सर्व महिला व आजी माजी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संवेदना निसर्ग सखी ग्रुपचे आदई डोंगरावर वृक्षारोपण

**पनवेल : प्रतिनिधी**

संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे संवेदना निसर्ग सखी ग्रुपने मंगळवारी (दि. २) आदई डोंगरावर जाऊन वृक्षारोपण केले. वेगवेगळ्या देशी झाडांची या वेळी लागवड करण्यात आली. या वर्षीचे विशेष म्हणजे निसर्गप्रेमी असलेल्या संस्थेबाहेरील महिलांचीही या कामासाठी साथ मिळाली.

आदई डोंगर हिरवगार करणाऱ्या पनवेल ट्रेकर ग्रुपच्या बोराटे सर आणि त्यांचे सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आजच्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पनवेलमध्ये कार्यरत अनुभूती संस्था, सिटीझन फोरम संस्थेतर्फे देशी झाडे उपलब्ध करून दिली. संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलतर्फे वृक्षारोपण कार्यक्रम दरवर्षी करण्यात येतो. यावर्षी संस्थेबाहेरील महिलांनी सहभागी होऊन बिज संकलन, उन्हाळ्यात झाडांना पाणी घालायला मदत करणे यासाठी सहभागी होण्याचा मानसं बोलून दाखवला.



हा कार्यक्रम यशस्वी होण्यास अनेक जणांचे मोलाचे सहाय्य मिळाल्याने आम्ही हा कार्यक्रम सुलभतेने पार पाडू शकलो. तसेच हे असे निसर्गात राममाण होण्याचे क्षण आम्हा सर्व महिलांसाठी एनर्जी बुस्टर पेक्षा कमी नाही. असे मतही या वेळी संस्थेच्या अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी व्यक्त केला.

दरम्यान, संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेल वर्षभर अनेक पर्यावरणपुरक उपक्रम राबवित असते.

**बऱ्याच महिलांना इच्छा असूनही घरातील अडचणीमुळे येणे शक्य होत नाही अश्या सर्व महिलांसाठी हा ग्रुप म्हणजेच निसर्गदेवतेच्या सेवेची सुवर्ण संधी होय. अश्या किमान शंभर जणांचा सक्षम ग्रुप तयार करण्याचा मानसं आहे. पनवेल जवळपास रहाणाऱ्या महिलांनी या ग्रुपमध्ये सहभागी होऊन काम चालू केले तर निश्चितच एक चांगले काम उभे राहू शकते.**
**–सुनेत्रा गवाणकर, अध्यक्षा**

# कुंडलिका नदी परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा




**रोहे : प्रतिनिधी**

शनिवारी रात्रभर मुसळधार पाऊस रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पडला आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने डोंगर माथ्यावरील नदी नाले. तुडुंब भरून वाहू लागले आहे. रोह्याची जीवन वाहिनी कुंडलिका नदी ही दुतर्फा तुडुंब भरून वाहत होती.

रोहा तालुक्यात शनिवारी रात्रभर जोरदार पाऊस पडल्यामुळे नदी नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. डोंगरमाथ्यावरून वाहत असलेल्या नाल्यातून पाणी कुंडलिका नदीच्या पात्रात येत असल्याने रोहा तालुक्यातील कुंडलिका नदी रात्रभर सतत पडलेला पावसामुळे तुडुंब भरून वाहू लागले आहे.

नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्याने नगर परिषदेने सायरन वाजून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. रोहा अष्टमी जुन्या पुलाला पाणी लागले होते. दुपारी रोहा अष्टमी पुलावर पाणी येण्याची शक्यता असल्याने रोहा अष्टमीचा जुना पूल वाहतुकीस बंद करण्यात आला होता. त्यामुळे नव्या पुलावरून वाहतूक पूर्णपणे चालू ठेवण्यात आली होती.

कोणत्याही अनुचित प्रकार घडू नये व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रोहाअष्टमी जुना पुलावरून राहदारी बंद राहवी यासाठी रोहा अष्टमी पुलाच्या दोन्ही बाजूस रोहा नगर परिषद कर्मचारी व पोलीस तैनात करण्यात आले होते. रोहा अष्टमी नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक विशाल काळे स्वतः जातीने लक्ष घालून होते.

रविवारी मात्र सकाळपासून ऊन पाऊस, असे चित्र दिसून आले. दिवसभर पावसाची अधूनमधून रिमझिम चालू होती.

# रायगडातील १० लाख जणींना मिळणार 'लाडक्या बहिणी'चा लाभ

**रोहे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना घोषीत केल्यापासुन महीलांकडुन आनंद व्यक्त होत आहे. महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनाचे २४ तासांत शासन निर्णय झाला. उत्पन्न, आदीवास, पाच एकर शेती या अटी संदर्भात शितीलता करण्यात आले आहे. राज्यातील अडीचकोटी पेक्षा जास्त महिलांना लाभ मिळणार आहे. रायगडात १० लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे, असे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केले.

अंगणवाडी सेविकांना अर्ज भरण्यासाठी इन्सेटीव देण्यात येणार आहे. प्रशासनानेसुध्दा पुढाकार घेऊन ग्रामीण भागात शिबिर घेण्यात यावे असे सांगत महिलांच्या विविध योजना महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने जास्तीत जास्त लाभ महिलांना देण्याचे प्रयत्न करीत आहोत,




असेही मंत्री तटकरे म्हणाल्या.

शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागु केल्यानंतर या योजनेचा लाभ महिलांना मिळावे यासाठी शासनाने जोरदार मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत रोह्यातील जेष्ठ नागरिक सभागृहात रोहा तहसील कार्यालय, पंचायत समिती व रोहा नगर परिषदेच्या वतीने अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण ठेवण्यात आले होते. याच ठिकाणी अर्ज नोंदणीचे शिबिर घेण्यात आले. या वेळी मार्गदर्शन करताना ना.आदीती तटकरे बोलत होत्या.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी किसन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भारत बास्टवाड, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, नायब तहसीलदार राजेश थोरे, नगर परिषद कार्यालयीन अधीक्षक विशाल काळे, प्रकल्प अधिकारी शरयु शिंदे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, अहमद दर्जी, स्नेहा आंब्रे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, शहर अध्यक्षा प्राजात्का चव्हाण आदी उपस्थित होते.

या शिबिरास मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी किसनराव जावळे यांनी अंगणवाडी सेविका या ३१ जुलैपर्यंत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनाचे अर्ज भरतील, अशी खात्री दिली आहे. ही महत्वकांक्षी योजना असल्याचे या वेळी सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्याकार्यकारी अधिकारी भारत बास्टवाड यांनी जिल्हापरीषदेच्या अंगणवाडी सेविका अर्ज जुलै महीन्यातच भरतील असे आश्वासन दिले. २० हजार महीला गटाची मदत अंगणवाडी सेविका यांनी घ्यावे. अर्ज भरण्याची जबाबदारी आपली असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश थोरवे व शरयु शिंदे यांनी केले.

# बँक दिवसाचे औचित्य साधून वन कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण

**पेण : प्रतिनिधी**

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्रबंधक कार्यालयाच्या वतीने बँक दिवसाचे औचित्य साधून पेण येथील वन कार्यालय निवास स्थानाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.



या कार्यकमाला एसबीआय बँकेचे प्रशासनिक कार्यालय बेलापूर येथील उपमहाप्रबंधक नवीन मिश्रा, पनवेल येथील क्षेत्रीय प्रबंधक राघवेंद्रकुमार, पेण येथील क्षेत्रीय प्रबोधक विलास शिंदे, पेण शाखेचे मुख्य प्रबंधक असलोक कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, वनक्षेत्रपाल कुलदीप पाटकर, पेण नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, नगरपालिकेचे अभियंता रमेश देशमुख, सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे पेण तालुका अध्यक्ष रविकांत ठाकूर, स्टेट बँकेचे निवृत्त कर्मचारी राजेंद्र हटकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# पद्मदुर्ग लीगतर्फे दत्त मंदिर येथे वृक्ष लागवड

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पद्मदुर्ग लीग तर्फे दरवर्षी क्रिकेटचे सामने आयोजित केले जातात. तरुणांमध्ये क्रिकेटची आवड निर्माण व्हावी व ग्रामीण भागातील होतकरू क्रिकेटपटू तयार व्हावेत यासाठी हा उपक्रम सुरू असतो. क्रिकेट बरोबरच आता पदमदुर्ग लीगमार्फत विविध सामाजिक व निसर्गाला आवश्यक असे उपक्रम राबवले जातात. यंदा त्यांच्यामार्फत मुरूड येथील दत्तमंदिर टेकडीवर विविध वृक्ष रोपण कार्यक्रम घेण्यात आला.

पाऊस जास्त पाडण्यासाठी जे वृक्ष आवश्यक आहेत अश्या वृक्षांची लागवड या वेळी करण्यात आली. या वेळी क्रिकेटमधील मंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. चिंच, आवळा, वड, निलगिरी, अश्या उपयुक्त वृक्षाची लागवड करून प्रत्येक सदस्याला एक वृक्षाची जबाबदारी देण्यात आली असून वृक्षाची वाढ होईपर्यंत वृक्षांची काळजी घेण्यात येणार आहे. या वेळी दत्तमंदिर टेकडीवर सुमारे ७० वृक्षांची लागवड मंडळातर्फे करण्यात आली.

कार्यक्रमासाठी मुरूड पद्मदुर्ग लीगचे अध्य प्रकाश चव्हाण आणि उपाध्यक्ष निलेश भायदे व २८ मंडळातील सदस्य यावेळी उपस्थित होते.पदमदुर्ग लीग मंडळातर्फे रक्तदान शिबिर तसेच चणेरे (शिरगाव) मुरुड जंजिरा येथील सातमकर कुटुंबातील चीमुकल्यास वैद्यकीय उपचारासाठी या मंडळाने दिलखुलास पणे सढळ हस्ते आर्थिक सहकार्य केलेसुद्धा केले होते. खेळाबरोबरच सामाजिक कार्यातसुद्धा पदमदुर्ग लीग मंडळाने वाखाण्याजोगे काम केले आहे.




# गवळी समाजातर्फे खासदार सुनील तटकरे यांचा सत्कार



**मुरूड : प्रतिनिधी**

नवनिर्वाचित रायगड रत्नागिरीचे खासदार सुनील तटकरे यांचा रायगड,ठाणे सोलापूर यादव गवळी समाज कमिटीमार्फत सुतारवाडी येथे सत्कार करण्यात आला. तटकरे यांना शाल श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सन्मानित करण्या त आले. या वेळी आमदार महेंद्र दळवी समर्थक शिवसेनेचे मुरुड तालुका संघटक दिनेश मिणमिने, गवळी समाज अध्यक्ष राजेश मेहेतर, सेक्रेटरी प्रफुल्ल वालेकर, मनोहर पाडगे, विनोद चोगले, विलास चौलकर, बळवंत वालेकर, विश्वास घोसाळकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उपस्थित यादव गवळी समाजाने आपल्या समस्या कथन केल्या. खासदार सुनील तटकरे यांनी गवळी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मी अग्रक्रम देणार असून पुढील काही दिवसात विविध ठिकाणी विकासाची कामे सुरू होती, असा विश्वास व्यक्त केला. सामाजिक बांधिलकी याचा प्राधान्याने विचार करून विकासाच्या कामाला गती देऊन ती कामे पूर्ण करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न असणार आहे. गवळी समाजाने माझा सत्कार केला त्या बद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

# कर्जत तालुका आदिवासी बहुल तालुका आहे -सुधाकर घारे

**कर्जत : प्रतिनिधी**

आदिवासी संघटना अनेक वर्षांपासून विविध उपक्रम राबवित असतात. ज्यामुळे अनेक विद्यार्थी घडले. शिक्षक बनवले, पोलिस, ग्रामसेवक, डॉक्टर अगदी आयपीएस अधिकारी बनले. कर्जत तालुका आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो, पण कर्जत तालुका उच्च आदिवासी तालुका आहे. चांगल्या प्रकारे शिक्षण घेतलेले आदिवासी आदिवासी संघटनेला माझी ज्या कामासाठी आवश्यकता असेल तेव्हा मी कायम स्वरूपी तुमच्या बरोबर उभा आहे, असा शब्द रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी दिला.

कर्जत तालुक्यातील आदिवासी समाजातील १० वी १२ वी मध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना भविष्यात चांगले करिअर घडविण्याच्या दृष्टीने त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आदिवासी ठाकूर समाज संघटना कर्जत तालुका यांच्या माध्यमातून अक्षदा मंगल कार्यालय कशेळे येथे विद्यार्थांचा गुणगौरव व मार्गदर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे,




शिवसेनेचे प्रसाद थोरवे उपस्थित होते. तसेच आदिवासी ठाकूर समाज संघटना कर्जत तालुका अध्यक्ष परशुराम दरवडा, उपध्यक्ष मंगल केवारी,पांडुरंग पुजारी, सचिव भगवान भगत, सहसचिव मोतीराम पादीर, गणेश पारधी, खजिनदार अर्जून केवारी, सह खजिनदार गणपत सांबरी, बाळू भगत आदी उपस्थित होते.

कर्जत तालुका बहुल आदिवासी समाज असून आदिवासी समाज आता शिक्षणाच्या प्रवाहात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने शिक्षण घेत आहेत. त्या सर्वांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी आदिवासी ठाकूर समाज संघटना कर्जत तालुका गुणगौरव व मार्गदर्शनाचे आयोजन केले होते. यामध्ये १० वी १२ वी प्रथम, द्वितिय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांना सुहास वारे यांच्या आईच्या स्मरणार्थ सन्मान चिन्ह, सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच शंभर टक्के निकाल लागलेल्या आदिवासी आश्रम शाळेचे मुख्याध्यापक महेश पाटील चाफेवाडी, राजेद्र माने अध्यक्ष पाथरज, राजू खरकंडे अध्यक्ष पिंगळस, भालीवडी मुख्याध्यापक मोहन पडघन, माणगाववाडी मुख्याध्यापक नंदकुमार इकारे, आश्रम शाळेतील मुख्याध्यापक यांनाही सन्मान चिन्ह देऊन सन्मानीत करण्यात आले. आदर्श शिक्षक दत्तात्रय हिंदोळा व दशरथ निरगुडा यांना सन्मानित करण्यात आले. प्रसाद थोरवे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# पोलादपुरातील कुडपणचा अवर्णनीय धवधवा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील मिनी महाबळेश्वर म्हणून सर्वपरिचित मात्र, इंग्रजांनी अविकसित ठेवलेले हिलस्टेशन आजतागायत अविकसितच राहिले आहे. भरदिवसा आकाशातील ढगांमध्ये वावरत असल्याचा आभास निर्माण व्हावा, असे येथील सृष्टीसौंदर्य असून या कुडपणमध्ये भिमाची काठी हा सुळका आश्चर्यचकित करणारा हवेतील बेटासारखा भूभाग आहे.



कुडपण खुर्दमध्ये भराडी नदी, भुतरान नदी आणि आवेरी नदी अशा तीन नद्यांचा संगम भराडी नदीसमोरील औदूंबराच्या वृक्षापासून जवळच्या पात्रात होऊन पुढे हे पात्र धबधब्यापासून हजारो फूट दरीमध्ये खोल कोसळून तयार होणारे पात्र रत्नागिरी जिल्ह्यातील खेड व चिपळूण तालुक्यांतून वाहणारी जगबुडी नदी म्हणून ओळखले जात आहे. अलिकडेच कुडपण खुर्द आणि कुडपण बुद्रुकदरम्यान एका कडयाजवळ एक पेव्हर ब्लॉकचा रॅम्प तयार करण्यात आला असून याठिकाणाहून या धबधब्यासह भिमाच्या काठीचे विलोभनीय दर्शन घडत आहे. पोलादपूर येथे मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरून अर्धा कि.मी.अंतरावरील चोळई नदीवरील दि लेप्रसी मिशन ऑफ इंडियाच्या लेप्रसी हॉस्पिटललगतच्या कोतवाल रस्त्याकडे जाणाऱ्या फाटयावरून देवपूरच्या पुढे गोळेगणी परसुले येथून क्षेत्रपाळपर्यंत जाऊन तेथून आमलेवाडी, कुडपण बुद्रुक, कुडपण खुर्द व शेलारांचे कुडपण याठिकाणी वर्षापर्यटनासाठी अवश्य जावे.सोबत चहा, पाणी, खाद्यपदार्थ, आधाराची काठी, टॉवेल, फोटोग्राफीची आवड असल्यास कॅमेरा अथवा मोबाईल फोन सोबत न्यावे.

# नागोठणे येथे मोफत मोतिबिंदु शस्त्रक्रिया शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे लायन्स क्लब आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पीटल पनवेल यांचे माध्यमातुन व पैगंबरवासी इस्माईलशेट नागोठणावाला यांचे स्मरणार्थ बुधवारी (दि. ३) मोफत मोतिबिंदु ऑपरेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरामध्ये ८३ लोकांचे डोळ्याचे चेकअप करण्यात आले त्यामधून २४ मोतिबिंदू रुग्ण आढळले. त्यांना लगेच ऑपरेशनसाठी पनवेल येथे नेण्यात आले असल्याची माहिती झोन चेअरमन एमजेएफ लायन विवेक सुभेकर यांनी दिली. दरम्यान, लायन्स क्लबच्या माध्यमातुन आरोग्य सेवेसाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन अध्यक्ष सुनील कुथे यांनी या वेळी केले.

लायन वर्षातील हा पहिलाच लॉन्चिंग प्रोग्राम असून यासाठी डिस्ट्रीक्ट कॅबीनेटचे साईट फर्स्टचे चेअरमन एमजेएफ लायन ए. एस. एन. मुर्ती यांच्या हस्ते लॉन्चीग करण्यात आले. या शिबिरासाठी महत्वपुर्ण आर्थिक योगदान नागोठण्यातील हिंदूस्तान प्लायवुड कंपनी या फर्मचे मालक आब्बाससर नागोठणावाला यांच्या कडून मिळाले. या वेळी आब्बाससर इस्माईलशेठ नागोठणावाला सोबत त्यांच्या पत्नी सौभाग्यवती फरिदाभाभी, जनता ट्रेडर्सचे मालक शब्बीरशेठ नागोठणावाला तसेच लायन्स क्लबचे अध्यक्ष सुनील कुथे, डिस्ट्रीक्ट चेअरमन एएसएन मुर्ती, झोन चेअरमन विवेक सुभेकर, चाटर्ड प्रेसिडेंट प्रकाश जैन, पप्पू इस्माईलशेट नागोठणेवाला, फरीदा अब्बास नागोठणेवाला, हुसेन शब्बीरशेठ नागोठणेवाला, शब्बीर अब्बास नागोठणेवाला, अलिफ्या शब्बीर नागोठणेवाला, मुरतूझा अब्बास नागोठणेवाला, सकिना मुरतूझा नागोठणेवाला उपाध्यक्ष लायन संतोष शहासने, सेकंड व्हायस प्रेसिडेंट विशाल शिंदे, सेक्रेटरी डॉक्टर अनिल गिते, ट्रेझरर दीपक गायकवाड, डायरेक्टर अनुक्रमे एमजेएफ सुधाकर जवके, दौलतराम मोदी, सुजाता जवके, विवेक करडे, विनोद सावंत, विलास चौलकर, साईट फर्स्ट चेअरमन स्मिता कुथे, दिपक लोणारी, नजमुद्दीन व्होरा, डॉ. साधना झोलगे, नवनिर्वाचित जयराम पवार आदी मान्यवरांसह आर झुनझूनवाला शंकरा आय हॉस्पिटलची डॉक्टर टिम, आशा सेविका उपस्थित होते.

या वेळी सुत्रसंचालन व आभार लायन्स क्लबचे सेक्रेटर डॉ. अनिल गिते यांनी केले. दरम्यान, लायन्स क्लब नागोठण्याच्या कार्याची दखल घेत नागोठण्यातील सामाजिक सेवा करण्याची आवड असणारे नामवंत व्यक्तीमत्व जयराम पवारसर यांनी लायन्स परिवारात प्रवेश घेतला.

# हेल्थकॉन हाफ मॅरेथॉनद्वारे डॉक्टरांनी दिला आरोग्यपूर्ण संदेश

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत मिशनच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियानास जागतिक डॉक्टर्स दिनाचे औचित्य साधून १ जुलैपासून प्रारंभ करण्यात आला. त्या अनुषंगाने हेल्थकॉम या वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टरांच्या संघटनेच्या माध्यमातून, लेट्स सेलिब्रेट फिटनेस या संस्थेच्या सहयोगाने, नवी मुंबई महापालिकेच्या वतीने नेरूळ जिमखाना ते मनपा मुख्यालय ते परत नेरूळ जिमखाना अशा हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि.७) करण्यात आले होते. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी झेंडा दाखवून या हेल्थकॉम हाफ मॅरेथॉनचा शुभारंभ झाला.



या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिवहन उपक्रमाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुषार दौंडकर, क्रीडा विभागाच्या प्रभारी उपआयुक्त अभिलाषा म्हात्रे, सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल व डॉ. अमोल पालवे, कार्यकारी अभियंता राजेश पवार तसेच हेल्थकॉन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राम, लेट सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या प्रमुख रिचा समित, नेरूळ जिमखाना अध्यक्ष शशी पांडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

सकाळी ५.३० वा. २१ किमी अंतराच्या हाफ मॅरेथॉनला प्रारंभ झाला. त्यानंतर १० किमी. व पाच किमी. मॅरेथॉन घेण्यात आली. यामध्ये ५००हून अधिक डॉक्टर्स उत्साहाने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे दिल्लीसह इतर राज्यातून १५० हून अधिक डॉक्टर्स आले होते.

या हेल्थकॉन हाफ मॅरेथॉनमध्ये नवी मुंबईतील डॉक्टरांनी विविध पारितोषिके संपादन करीत उल्लेखनीय कामगिरी केली. यामध्ये डॉ. अनिता बजाज २१ किमी. अंतराच्या प्रथम क्रमांकाच्या विजेत्या ठरल्या. डॉ. चेतन सिंघल, डॉ.अमित घरत, डॉ. नचिकेत जाधव यांनी २१ किमीच्या मॅरेथॉनमध्ये पारितोषिके संपादन केली, तसेच दहा किमी. अंतराच्या मॅरेथॉनमध्ये डॉ. प्रवीण गायकवाड, डॉ. आरती गायकवाड, डॉ. वैशाली लोखंडे, डॉ. केतकी दवे यांनी पारितोषिके पटकावली.

सहभागी होणाऱ्या सर्व धावपटू डॉक्टर्सना मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच प्रत्येक वयोगटातील विजेत्या पहिल्या तीन क्रमांकांच्या पुरूष व महिला धावपटूंना सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले. विशेष म्हणजे या ठिकाणी मान्यवरांच्या स्वागतासाठी पर्यावरण आणि आरोग्य या दोन्ही दृष्टीने उपयुक्त अशी फळांची करंडी स्नेहभेट म्हणून देण्यात आली.

# टी-२० मालिकेत झिम्बॉब्वेचा भारतावर १३ धावांनी विजय

**हरारे : वृत्तसंस्था**

भारत आणि झिम्बॉब्वे यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना हरारे स्पोर्ट्स क्लब येथे शनिवारी (दि.६) खेळला गेला. या सामन्यात झिम्बॉब्वेने टी-२० विश्वचषक विजेत्या टीम इंडियाच्या यंग ब्रिगेडचा १३ धावांनी धुव्वा उडवला. या पराभवामुळे टीम इंडिया या मालिकेत ०-१ने पिछाडीवर पडली आहे. २०२४मधील टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतीय संघाचा हा पहिला पराभव होता. यापूर्वी भारताने सर्व मालिका आणि विश्वचषकातील सामने जिंकले होते.



दोन्ही संघांमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार शुबमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर झिम्बॉब्वेने पहिल्या डावात फलंदाजी करताना २० षटकांत नऊ गडी गमावून ११४ धावा केल्या. या काळात भारतीय गोलंदाजांची कामगिरी अप्रतिम होती. टीम इंडियाकडून रवी बिश्नोईने चार विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर वॉशिंग्टन सुंदरने दोन, मुकेश कुमार आणि आवेश खानने प्रत्येकी एक विकेट घेतली.

सामन्याच्या दुसऱ्या डावात टीम इंडियासमोर विजयासाठी केवळ ११६ धावांचे लक्ष्य होते जे भारतीय संघ अगदी सहज साध्य करण्याच्या इराद्याने मैदानात उतरले होते, मात्र भारतीय संघाला हे लक्ष्य गाठता आले नाही आणि १९.५ षटकांत १०२ धावांवर सर्वबाद झाला. या काळात कर्णधार गिल सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने २९ चेंडूत ३१ धावा केल्या. याशिवाय वॉशिंग्टन सुंदरने २७ आणि आवेश खानने १२ चेंडूत १६ धावा केल्या, तरीही टीम इंडियाने शेवटच्या षटकात सामना गमावला.

# एमएस धोनीने पत्नीसह साजरा केला वाढदिवस



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी रविवारी (दि.७) ४३ वर्षांचा झाला. महेंद्रसिंग धोनीने मुंबईत मध्यरात्री पत्नीबरोबर केक कापून वाढदिवस साजरा केला. यादरम्यान साक्षीने 'कॅप्टन कूल' म्हणून प्रसिद्ध असलेल्या महेंद्रसिंग धोनीच्या पायाला स्पर्श करून त्याचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर साक्षीने सेलिब्रेशनचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. केक कापताना धोनीच्या एका गोष्टीने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. तो केक कापताना म्हणाला, 'ये एगलेस केक है ना.'

महेंद्रसिंग धोनीच्या वाढदिवसानिमित्त बॉलिवूड अभिनेता सलमान खानही उपस्थित होता. 'हॅपी बर्थडे कॅप्टन साहब!' असे कॅप्शन देत सलमान खानने इन्स्टाग्रामवर एक फोटो पोस्ट केला आहे. धोनीच्या आयपीएल फ्रँचायझी चेन्नई सुपर किंग्सनेही हाच व्हिडीओ शेअर केला आणि कॅप्शन दिले, 'पार्टी सुरू झाली आहे!'

# 'कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांसाठी रोहितच कर्णधार'

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताला तब्बल ११ वर्षांनंतर आयसीसी चषकावर आपले नाव कोरण्यात यश आले. २९ जून रोजी बार्बाडोस येथे दक्षिण आफ्रिकेवर सात धावांनी विजय मिळवून भारतीय संघ विश्वविजेता ठरला. त्यानंतर आता बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी रोहित शर्माबाबत मोठी घोषणा केली आहे. रोहित शर्माने विश्वचषक जिंकल्यानंतर टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेत असल्याचे जाहीर केले होते, मात्र यापुढे कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांसाठी तोच



कर्णधार असेल, असे जय शाह यांनी एका व्हिडीओ संदेशाद्वारे जाहीर केले आहे.

पुढील वर्षी होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी आणि तिसऱ्या आयसीसी कसोटी विश्वचषकासाठी रोहित शर्माच भारतीय संघाचे नेतृत्व करेल, असे त्यांनी सांगितले.

आपल्या व्हिडीओ संदेशात जय शाह म्हणाले, टीम इंडियाला ऐतिहासिक विजयाच्या खूप खूप शुभेच्छा देतो. हा विजय मी प्रशिक्षक राहुल द्रविड, कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांना समर्पित करीत आहे. मागच्या वर्षभरातील आमचा हा तिसरा अंतिम सामना होता. जून २०२३मध्ये आम्ही कसोटी विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात पराभूत झालो. नोव्हेंबर २०२३ मध्ये एकदिवसीय विश्वचषकात सलग दहा सामने जिंकून आम्ही चाहत्यांची मने तर जिंकली, पण विश्वचषक जिंकू नाही शकलो. मी राजकोटमध्ये तेव्हाच सांगितले होते की, जून २०२४मध्ये आम्ही मन आणि कप दोन्ही जिंकू आणि भारताचा ध्वज त्या मैदानात रोवू, असेही ते म्हणाले.

# रोह्यात खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त बॅडमिंटन स्पर्धा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त कै. दत्ताजीराव तटकरे इनडोअर स्टेडियम येथे ५ ते १४ व १५ ते २५ वयोगटातील बॅडमिंटन खेळाडूंची बॅडमिंटन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उल्लेखनीय काम करणाऱ्या बॅडमिंटन खेळाडूंचा माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या उद्घाटन कार्यक्रमाला माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, महिलाध्यक्ष प्राजाक्ता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, मजीद पठाण, माज सवाल, पप्पु सरणेकर, सुर्यकांत कोलाटकर, राहुल मोहीते, नुरी रोहावाला, विनीत वाकडे, निलेश शिर्के, रवी चाळके, जितेंद्र ठमके, राहुल बोबड, परशुराम चव्हाण, विशाल शेलार आदी उपस्थित होते.

माजी आमदार अनिकेत तटकरे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, शहराध्यक्ष अमित उकडे यांनी बॅडमिंटन खेळाचा आनंद लुटला.



# रायगडातील प्रशिक्षक, पंच व स्कोअरर्ससाठी संवाद शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने बुधवारी (दि.१०) खोपोली येथील महाराजा बँक्वेट हॉल येथे सकाळी १०.३० वा. रायगड जिल्ह्यातील सर्व अकॅडमी, क्लब व संघांच्या प्रशिक्षक आणि प्रतिनिधींसोबत संवाद शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये २०२४/२५च्या क्रिकेट हंगामात होणाऱ्या विविध क्रिकेट स्पर्धांचे आयोजन, स्पर्धेची रूपरेषा व नियोजन करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे, विविध वयोगटातील स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व अकॅडमी, क्लब व संघांचा सहभाग निश्चित करणे, जिल्ह्यातील सर्व खेळाडूंचे रजिस्ट्रेशन करणे व त्यांना आरडीसीएमार्फत ओळखपत्र देण्याविषयी माहिती देणे, सर्व वयोगटातील होणाऱ्या स्पर्धेसाठी नियम-नियमावली तयार करणे, मुलींच्या क्रिकेट स्पर्धांचे नियोजन करणे, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन मार्फत घेण्यात येणाऱ्या निमंत्रित स्पर्धांपैकी काही सामने रायगड जिल्ह्यात घेण्याबाबत माहिती देणे, रायगड जिल्ह्यात क्रिकेट वाढवण्यासाठी विविध मान्यवरांचे मार्गदर्शन व चर्चा या शिबिरामध्ये होणार आहे.

पंच व स्कोअरर्स यांच्यासाठी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनमार्फत आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पंच व स्कोअरर्सच्या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये बीसीसीआयचे पंच व स्कोअरर्स यांच्यामार्फत मार्गदर्शन होणार आहे. या संवाद शिबिरासाठी प्रत्येक अकॅडमी, क्लब व संघांच्या एका प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याचे आवाहन आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी केले आहे.

# वर्ल्ड चॅम्पियन जॉन सीनाची निवृत्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



१६-वेळा डब्ल्यूडब्ल्यूईचे चॅम्पियनशीप पटकावणाऱ्या जॉन सीनाने २० वर्षांपेक्षा जास्त दीर्घ कारकिर्दीतून संन्यास घेण्याचा निरोप घेतला आहे. जॉन सीनाने अचानक निवृत्तीची घोषणा करून त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का दिला आहे.

जॉन सीनाने २००२मध्ये डब्ल्यूडब्ल्यूईमध्ये पदार्पण केले होते. २० वर्षांहून अधिक काळ आपल्या रोमांचक खेळीने चाहत्यांचे मनोरंजन केले. डब्ल्यूडब्ल्यूई रिंगमध्ये जॉन सीना आणि द रॉक, ट्रिपल एच आणि रँडी ऑर्टन सारख्या कुस्तीच्या दिग्गजांसह जबरदस्त झुंज दिसली आहे.

जॉन सीनाने १३ वेळा डब्ल्यूडब्ल्यूई चॅम्पियनशिप आणि तीन वेगवेगळ्या प्रसंगी वर्ल्ड हेवीवेट चॅम्पियनशिपचे विजेतेपद जिंकले. डब्ल्यूडब्ल्यूईमध्ये सर्वाधिक विजेतेपदे जिंकण्याच्या बाबतीत जॉन सीना महान कुस्तीपटू रिक फ्लेअरच्या बरोबरीत आहे. त्यांच्या निवृत्तीने चाहत्यांना मोठा धक्का दिला आहे.


जीवेत् शरदः शतम्!

**सुनील म्हात्रे**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

रईस शेख, महादेव नाईक


## श्री. स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर

वर्ष २१ वे ।। ॐ बाळकृष्णाय नमः।। स्थापना २००३



श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर) | श्री समर्थ सद्गुरू भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर) | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) **पिताजी** **श्री. चांगू काना ठाकूर** | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) माताजी **श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर** | श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई)

## पुण्यतिथी सोहळा

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी **'श्री.चांगू काना ठाकूर'** यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०३, शके १९४६, **मंगळवार, दि. ०९/०७/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा.** श्री समर्थ दासबोध वाचण ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०४, शके १९४६ **बुधवार, दिनांक १०/०७/२०२४** रोजी दुपारी १२.०० वा. पुण्यतिथी निमित्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधु भगिनीनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## कार्यक्रम

**मंगळवार, दिनांक ०९/०७/२०२४**

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.०० - भजन** | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर<br>पखवाज : आत्माराम मोकल |
| **सकाळी १०.०० ते १२.०० - प्रवचन** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर, श्री.भागवत साहेब, पुणे<br>ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज, चिपळूण,<br>ह. भ. प. रामनाथ महाराज, वहाळ, श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी),<br>श्री. अरुणशेठ ठाकूर |
| **दुपारी ०२.०० ते ०३.०० - भजन** | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण. गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| **दुपारी ०३.०० ते ०५.०० - भजन** | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर<br>गायीका : श्रीमती हिराबाई घरत, सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत,<br>सौ. चंद्रभागा घरत. श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर<br>गायीका : सौ. सुप्रिया घरत, वादक : तुषार घरत |
| **सायं. ०५.०० ते ०६.०० - भजन** | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर. गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>श्री. हर्षल फडके (विहीघर), पखवाज : श्री. मधुकर डोंगरे |
| **सायं. ६.०० ते ७.०० - आरती** | : माऊलींची आरती |
| **सायं. ०७.०० ते ०८.००** | एकनाथी भागवत ध्यान |
| **सायं. ०८.०० ते ०९.०० - भजन** | दत्त प्रासादिक भजन मंडळ, कोपर<br>बुवा : श्री. वसंतशेठ पाटील, कोपर<br>पखवाज : गौरव म्हात्रे, गव्हाण |
| **सायं. ०९.०० ते ११.०० - किर्तन** | ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज धाटाव आणि मंडळी |
| **रात्री ११ नंतर** | रात्रीचे बारा अभंग,<br>जागर (भजन- सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

**बुधवार, दिनांक १०/०७/२०२४**

| | |
|---|---|
| **सकाळी ०८.०० ते १०.०० - भजन** | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर-रांजणपाडा)<br>बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी,<br>वसंतशेठ पाटील-कोपर, ज्ञानेश्वर म्हात्रे-गव्हाण, गणपत ठाकूर-कोपर, भाऊ ठाकूर, सुरेश ठाकूर - शि. नगर, नितीन ठाकूर-त. पाडा, श्री. महेश पाटील, न्हावा, पखवाज : गौरव म्हात्रे |
| **सकाळी १०.०० ते १२.०० - प्रवचन** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर, |
| **दुपारी १२.०० वाजता** | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

## कार्यक्रमाचे ठिकाण

**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**

मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५

## व्यवस्थापक

**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)**

शिवाजीनगर - गव्हाण - न्हावेखाडी - कोपर (संचलित)

## संयोजक

**श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार) आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com